# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक १० ■ जानेवारी २०२६ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ३६
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 10 ■ January 2026 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 36



## ॐ गं गणपतेय नमः

!! वंदे मातरम् !!

अंक www.vhp.org वर उपलब्ध



E-mail : hindubodh.pmp@gmail.com


घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता गृहकर्ज योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता एज्युफ्लेक्स कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी ₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी ₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता वाहनकर्ज कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया | त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा 'कॅशलेस'...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी मोबाईल बँकिंग सेवा
JetPay
we proudly supporting... Digital India
BHARAT BILLPAY
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258 | www.janatabankpune.com
*अटी व नियम लागू.

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष – पंचवीस : अंक १० वा
शके १९४७
जानेवारी २०२६

संपादक
श्री. रविकांत कळंबकर
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

[redacted]

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण – प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे – प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक – प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी – प्रांत प्रचार–प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले – प्रांत प्रचार–प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे – नागपूर
श्री. विजयकुमार पिसे – सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/–, वार्षिक वर्गणी रु. २००/–

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे – ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... श्रीगणेशा, समाज परिवर्तनाचा
रविकांत कळंबकर ................................ ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ................................................ ०६

✦ असा मित्र असा नेता पुन्हा मिळणे नाही
श्रीराम कुलकर्णी .................................. १५

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................................... १९

✦ हिन्दू धर्म के सच्चे पथ–प्रदर्शक थे स्वामी श्रद्धानन्दजी
प्रसून कुमार मिश्र .................................. २१

✦ दासबोध जयंती – प्रसार आदर्श विचारांचा
ॲड. स्वाती जेरे .................................. २३

✦ आधुनिक विज्ञान – नवनिर्माण की पुनर्शोध
हणमंत नाडगौडा .................................. २५

✦ भारताची संस्कृती – जीवन पद्धती
डॉ. सचिन लादे .................................... २७

✦ माणूस एक विकाऊ वस्तू
ब्रह्मानंद घुगरे ...................................... २८

✦ एक वर्तुळ पूर्णत्वाकडे
रवींद्र मुळे ........................................... ३०

✦ स्वदेशी विमानवाहू युद्धनौका – आय एन एस विक्रांत
काशिनाथ देवधर .................................. ३२

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

’हिंदुबोध’ मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी – ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे – ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**“Hindu Bodh” Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## वंदे मातरम्।

वंदे मातरम्, वंदे मातरम्!
सुजलाम्, सुफलाम्, मलयज शीतलाम्,
शस्यश्यामलाम्, मातरम्! वंदे मातरम्!

शुभ्रज्योत्सनाम् पुलकितयामिनीम्,
फुल्लकुसुमित द्रुमदल शोभिनीम्,
सुहासिनीम् सुमधुर भाषिणीम्,
सुखदाम् वरदाम्, मातरम्!
वंदे मातरम्, वंदे मातरम्।।
कोटि कोटि कण्ठ कल कल निनाद कराले
द्विसप्त कोटि भुजैर्धृत खरकरवाले
के बोले मा तुमी अबले
बहुबल धारिणीम् नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीम् मातरम्।। वंदे मातरम्!

तुमि विद्या तुमि धर्म, तुमि ह्रदि तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे
बाहुते तुमि मा शक्ति,
ह्रदये तुमि मा भक्ति,
तोमारै प्रतिमा गडि मन्दिरे-मन्दिरे मातरम्।। वंदे मातरम्!

त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदल विहारिणी
वाणी विद्यादायिनी, नमामि त्वाम्
नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलां सुफलां मातरम्।। वंदे मातरम्!
श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणीं भरणीं मातरम्।।

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/- फक्त आहे. वार्षिक रु. २००/- तर त्रैवार्षिक रु. ५००/- वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# श्रीगणेशा,
# समाज परिवर्तनाचा

## संपादकीय

२०२५ वर्ष सरताना देशात योगायोगाने दोन महत्त्वाच्या शुभ घटना घडल्या. दि. २५ नोव्हेंबर २०२५ मंगळवार या दिवशी पहिली मंगल घटना अयोध्येत आपल्या सर्वांना पहायला मिळाली. एखादे वाक्य संपल्यावर ज्याप्रमाणे पूर्णविराम दिला जातो त्याचप्रमाणे राममंदिर घटना क्रमाचा पूर्णविराम मंदिरावर भगवा ध्वज फडकवून केला गेला.

९ नोव्हेंबर २०१९ ला पूर्णपणे निकाल राममंदिराचे बाजूने दिला गेला आणि जागा ताब्यात मिळाली. ज्या जागेवरील कलंक पाचशे वर्षांच्या संघर्षानंतर पुसला गेला होता त्याच ठिकाणी भव्य मंदिर उभारणीचा मार्ग मोकळा झाला. ५ ऑगस्ट २०२० मा. पंतप्रधानांचे हस्ते भूमीपूजन सोहळा संपन्न झाला. केवळ पंचेचाळीस महिन्यात म्हणजेच, २२ जानेवारी २०२४ ला रामलला मंदिरात विराजमान झालेले आपल्याला पहायला मिळाले आणि २५ नोव्हेंबर २०२५ राममंदिर पूर्ण करून त्यावरील कळसावर धर्मध्वजा फडकविला गेला. मा. पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, पूजनीय सरसंघचालक मा. मोहनजी भागवत आणि उत्तर प्रदेशचे मा. मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी यांचेसह अनेक मान्यवर व सुमारे वीस हजार प्रमुख नागरिकांचे उपस्थितीत कोट्यावधी हिंदूंचे, रामभक्तांचे स्वप्न सत्यात आलेले पहायला मिळाले.

राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामींचे वचन 'जे देखिले रात्री, ते ते तैसेंची होतसे' जे स्वप्न पाहिले त्याहीपेक्षा भव्य व सुंदर मंदिर बनले आहे आणि आता त्यावर धर्मध्वज अभिमानाने, डौलाने, आनंदाने आपल्या नजरेत दिसतो आहे. संपूर्ण भगव्या रंगाचा हा ध्वज २२ फूट लांब, ११ फूट रुंद असून तो १६१ फूट उंच कळसावर ४२ फूट उंच ध्वजदंडावर उभारण्यात आला आहे. ध्वजावर सूर्य, ओम व कोविदार वृक्ष अशी शुभ चिन्हे आहेत. सूर्यवंशी राजांच्या ध्वजावर या वृक्षाची प्रतिमा असायची. वाल्मिकी रामायणानुसार भरत राजा च्या ध्वजावरही ही कोविदार वृक्षाची प्रतिमा पहायला मिळते. या धर्मध्वजामुळे राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश रहाणार हे अधोरेखित केले गेले आहे.

दुसरी घटना, ८ डिसेंबर २०२५ या दिवशी संसदेत सुमारे दहा तास चर्चा केली गेली ती वंदेमातरम् या गीताला एकशे पन्नास वर्षे झाल्याचे निमित्ताने. ज्या मंत्राने स्वातंत्र्य लढ्याला प्रेरणा दिली, त्याग, तपस्येचा मार्ग दाखविला त्या वंदेमातरम् चा वर्धापन दिन संसदेत सर्वांगाने चर्चा करून साजरा केला गेला. बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी १८७५ मध्ये वंदेमातरम् हे गीत लिहिले. प्रचलित वंदेमातरम् हे दोन कडव्यांचेच ऐकवले जाते. परंतु अन्य भागात भारतमातेचे दुर्गा असे वर्णन असून भारताचा आत्मा हा आध्यात्मिक आहे असा भाव आहे तो समजावून घेणे महत्त्वाचे वाटते.

वंदेमातरम्ला ५० वर्ष झाली तेव्हा देश गुलामगिरीत होता. १०० वर्ष झाली तेव्हा आणिबाणी च्या छायेत होता आणि आता स्वतंत्र भारतात १५० वर्षे पूर्ण होताना सुद्धा देशांतर्गत विरोध केला जातो आहे. संपूर्ण वंदेमातरम् हे संविधानाचे विरोधी असल्याचे म्हटले जाते. कां? तर केवळ भारतमातेचे वर्णन दुर्गा माता स्वरुपात आहे म्हणून, देशाप्रमाणेच वंदेमातरम् चे ही विभाजन झाले. आता सर्वत्र संपूर्ण वंदेमातरम्चेच गीत गायन होणे आवश्यक आहे.

एकविसाव्या शतकाचा पाव हिस्सा संपून आता दुसरा टप्पा सुरु होतो आहे. यापुढील पंचवीस वर्षात अनेक महत्त्वाचे टप्पे होणार आहेत त्यातील महत्त्वाचा म्हणजे स्वातंत्र्याचा शतक महोत्सव. ह्या टप्प्याचा शुभारंभ रा. स्व. संघाच्या शताब्दीतून होतो आहे. संघाचे पुढील सर्व कार्यक्रम हे समाजाभिमुख रहाणार आहेत कारण, व्यक्ती व्यक्तीतूनच समाजाला विविध स्तरांवर सुसंस्कारीत करत 'राष्ट्र प्रथम' हा भाव जागृत करण्याचे कार्य संघाने अंगिकारले आहे.

समाज परिवर्तनासाठी नवीन वर्षाचा शुभारंभही शुभ संकेताचा होतो आहे. २२ जानेवारी रोजी रामलला मंदिरात येवून दोन वर्षे होत आहेत आणि २२ जानेवारी २०२६ ला पण गणेश जयंती आहे. व्यक्तीगत जीवनात नागरिक कर्तव्य जाणून कुटुंबात सुसंस्कारित वातावरण ठेवणे तसेच पर्यावरणाचे पैलू सांभाळत समाज जीवनात एकरस सुदृढ समाज, देशोन्नतीसाठी कटिबद्ध आहे. असे परिवर्तन आता घडवायचे आहे. नवीन वर्षाचा नवीन संकल्प हाच घेवून आपण सर्वजण आता कार्यरत होऊ या.

।। वंदेमातरम् ।।

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**



# विहिंप प्रांत अध्यक्षपदी प्राचार्य धरणे

## हस्तिनापूर येथे केंद्रीय बैठक़ीत नियुक्तीची घोषणा

सोलापूर, दि.२० डिसेंबर : विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्षपदी प्राचार्य श्री. गजानन धरणे यांची नियुक्ती झाली आहे. हस्तिनापूर येथे विहिंप केंद्रीय प्रन्यासी बैठकीत श्री धरणे सर यांच्या नियुक्तीची घोषणा झाली. मूळचे सोलापूरचे श्री धरणे सर विद्यार्थी दशेपासून संघ स्वयंसेवक असून अभाविपमध्ये अनेक दायित्व त्यांनी सांभाळले आहेत. सध्या सोलापुरातील सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. धरणे यांच्या नियुक्तीने सोलापूरचा सन्मान झाला आहे.

मेरठ प्रांतातील हस्तिनापूर येथे विश्व हिंदू परिषदेच्या केंद्रीय प्रन्यासी मंडल बैठक़ीचा समारोप १९ डिसेंबर रोजी झाला. यावेळी अ.भा. स्तरावरील अन्य नियुक्तींच्या घोषणा झाल्या. यावेळी मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद रामुका, सहमंत्री प्रा.अनंत पांडे, प.महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण, सहमंत्री ॲड.सतीश गोरडे, सहमंत्री नीतीन वाटकर, संघटनमंत्री अनिरूध्द पंडित तसेच अन्य पदाधिक़ारी उपस्थित होते.

नवनियुक्त प्रांत अध्यक्ष प्राचार्य धरणे यांचा परिचय...

श्री. गजानन रेवणसिद्ध धरणे विद्यार्थी दशेपासून संघ स्वयंसेवक आहेत. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्राशी निगडित अनेक संस्थांमध्ये गेली चाळीस वर्षे सक्रिय आहेत. अभाविपशी आजही ते जोडलेले आहेत. त्यांचे शिक्षण (सोलापूर) इ ए , च् ए (चशलह एपसस) झाले असून यंत्र अभियांत्रिकी विभागात गेली ४० वर्षे प्राध्यापक व गत १६ वर्षापासून श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक येथे प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत.

धरणे सर १९८० पासून अभाविपमध्ये सक्रिय आहेत. प्रारंभी कराड शहर मंत्री, सातारा जिल्हा विस्तारक, सातारा जिल्हा प्रमुख, नंतर सोलापूर शहर अध्यक्ष, १९९२ ते १९९४ अभाविप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष. १९९३ पासून भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान महाराष्ट्र प्रदेश सहकार्यवाह, पुढे २००५ ते २०१५ पर्यंत प्रतिष्ठानचे कार्यवाह होते. २०१० मध्ये सोलापूर जनता सहकारी बँकेत प्रथम संचालक झाले. २०१५ मध्ये त्यांची उपाध्यक्षपदी निवड झाली. याच बॐकेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी यशस्वीपणे धुरा सांभाळली. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (Medibal University) नाशिक, सिनेट. सदस्य अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सोलापूर विद्यापीठ, हिंदू वीरशैव लिंगायत मंच सोलापूर जिल्हा संयोजक, पश्चिम महाराष्ट्र सहसंयोजक, श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळाचे संचालक आहेत.

प्राचार्य श्री गजानन धरणे यांचे विश्व हिंदू परिषद परिवारात स्वागत तसेच विहिंपचे मुखपत्र हिंदू बोध च्या वतीने त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा.

**विजयकुमार पिसे, संपादक मंडळ हिंदू बोध**



विहिंप मुंबई क्षेत्र मंत्री रामचंद जी रामुका, प्रांत मंत्री किशोर जी चव्हाण, सहमंत्री ॲड. सतीश जी गोरडे यांनी प्राचार्य श्री गजानन धरणे व सौ. धरणे यांना सन्मानित केले. त्या प्रसंगीचे छायाचित्र

# मुंबई क्षेत्र संघटनमंत्रीपदी अनिरुध्द तथा अण्णा पंडित बजरंग दल राष्ट्रीय सहसंयोजकपदी विवेक कुलकर्णी

सोलापूर, दि.२० डिसेंबर : संघ प्रचारक श्री अनिरुध्द तथा अण्णा पंडित यांची विश्व हिंदू परिषद मुंबई (महाराष्ट्र व गोमंतक राज्य) क्षेत्र संघटनमंत्रीपदी तर विवेक कुलकर्णी (अहिल्यानगर) बजरंग दल राष्ट्रीय सहसंयोजकपदी नियुक्ती झाली आहे. हस्तिनापूर येथे विहिंप केंद्रीय प्रन्यासी बैठकीत अण्णा पंडित आणि विवेक कुलकर्णी यांच्यासह अन्य नियुक्तीची घोषणा झाली. याशिवाय अरूणजी नेटके केन्दीय प्रमुख – मंदिर अर्चक पुरोहित आहेत या व्यतिरिक्त जबाबदारी धर्मयात्रा – केन्द्रीय सहप्रमुख, अजय मुडपे प्रांत सहमंत्री कोकण प्रांत आहेत. या व्यतिरिक्त विमर्श क्षेत्र प्रमुख (प्रचार टोळी) आणि श्री. पांडुरंग अण्णा राउत प्रांत कार्यकारिणी सन्माननीय सदस्य अशा नव्या नियुक्त्या आणि दायित्व बदल झाले आहेत.

मूळचे पालघरचे बाल स्वयंसेवक अनिरुध्द तथा अण्णा पंडित संघ प्रचारक आहेत. २०१५ मध्ये पुण्यात शिवशक्ती संगम पार पडल्यानंतर त्यांची नियुक्ती विश्व हिंदू परिषदेकडे कोकण प्रांत (मुंबई, कोकण आणि गोमंतक) संघटनमंत्री हे दायित्व सोपविले. सोलापुरात संघाचे जिल्हा प्रचारक नंतर पुणे विभाग प्रचारक म्हणून अण्णा पंडित यांनी काम पाहिले आहे. शिवाय नाशिक विभाग आणि कोल्हापूर विभागाचे प्रचारक म्हणूनही कार्यरत होते. सध्या त्यांच्याकडे विहिंप कोकण आणि प.महाराष्ट्र प्रांत संघटनमंत्री असे दायित्व होते. आता ते मुंबई क्षेत्र संघटनमंत्री असे दायित्व आले आहे. मुंबई क्षेत्रमध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्य, विदर्भ, देवगिरी, प.महाराष्ट्र, कोकण आणि गोवा राज्य असे क्षेत्र आहे.

बजरंग दलाचे क्षेत्र संयोजक श्री विवेकजी कुलकर्णी यांच्याकडे आता राष्ट्रीय बजरंग दल सहसंयोजक असे दायित्व आले आहे. मूळचे अहिल्यानगरचे विवेकजी उत्कृष्ट आणि आक्रमक वक्ते म्हणून परिचित आहेत. विवेक दिनकर कुलकर्णी बालपणापासून संघ स्वयंसेवक आहेत. जामखेड तालुका सहकार्यवाह, अहिल्यानगर सहमंत्री विश्व हिंदु परिषद, बजरंग दल प्रांत सहसंयोजक पश्चिम महाराष्ट्र, विश्व हिंदु परिषद प्रांत सहमंत्री पश्चिम महाराष्ट्र, मुंबई क्षेत्र सहसंयोजक मुंबई क्षेत्र संयोजक बजरंग दल आणि आता अखिल भारतीय बजरंग दल सह संयोजक असे दायित्व आहे.

तसेच सोलापूरचे श्री गजानन धरणे यांची पश्चिम महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष म्हणून घोषणा झाली आहे. धरणे सोलापूरच्या सिध्देश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य आहेत. संघातील आयाम हिंदू वीरशैव लिंगायत मंच प्रांत संयोजक अशी जबाबदारी आहे. तर विद्यमान प्रांत अध्यक्ष श्री पांडुरंग अण्णा राउत आता प्रांत कार्यकारिणी सन्माननीय सदस्य हे दायित्व राहील.तसेच अरुणजी नेटके केन्दीय प्रमुख – मंदिर अर्चक पुरोहित आहेत. केंद्रीय प्रन्यासी बैठकीत या व्यतिरिक्त जबाबदारी धर्मयात्रा – केन्दीय सह प्रमुख असे दायित्व आहे. मा अजय मुडपे प्रांत सहमंत्री कोकण प्रांत आहेत. या व्यतिरिक्त विमर्श क्षेत्र प्रमुख (प्रचार टोळी) हे दायित्व देखील आहे. सर्व दायित्व पदाधिकारी यांचे विश्व हिंदू परिषद हिंदू पश्चिम महाराष्ट्र प्रांत हिंदू बोध च्या वतीने मन:पूर्वक अभिनंदन आणि स्वागत.



मुंबई विश्व हिंदू परिषद क्षेत्र मंत्री, उद्योगपती मा रामचंन्दजी रामुका, संघटनमंत्री मा अनिरुद्ध जी पंडीत, प्रांत मंत्री मा किशोरजी चव्हाण, प्रांत सह मंत्री ज्येष्ठ विधिज्ञ ॲड सतिश गोरडे व मा संपादक तरण भारत व विभाग सह मंत्री मा विजयकुमार पिसे यांनी न्याय क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल सोलापूर जिल्हा सरकारी वकील ॲड प्रदिपजी राजपूत यांना सन्मानित केले.




## प्रन्यासी मंडल बैठक - मेरठ

विश्व भर में रामराज्य की पुनर्स्थापना हो : स्वामी विवेकानंद जी महाराज

– संघ शताब्दी वर्ष में इसी संकल्प को लेकर प्रन्यासी मंडल बैठक प्रारंभ

– विश्व हिंदू परिषद की प्रन्यासी मंडल बैठक के उद्घाटन सत्र में संतों का ओजस्वी संदेश

– देश–विदेश से पहुंचे प्रन्यासी, हस्तिनापुर की पावन धरा से रामराज का शंखनाद

हस्तिनापुर (मेरठ)। १७ दिसंबर २०२५ ।

भारत वर्ष की महाभारत कालीन नगरी हस्तिनापुर में विश्व हिंदू परिषद की प्रन्यासी मंडल बैठक के उद्घाटन सत्र को संबोधित करते हुए परम पूजनीय स्वामी विवेकानंद जी महाराज ने कहा कि भारत ही नहीं, बल्कि संपूर्ण विश्व में मानवता पर आधारित रामराज की पुनः स्थापना ही हमारा परम लक्ष्य है।उन्होंने स्पष्ट कहा कि अयोध्या में भगवान श्रीराम का मंदिर निर्माण केवल एक चरण है, वास्तविक उद्देश्य पूरे विश्व में रामराज की स्थापना है। संघ शताब्दी वर्ष में इसी संकल्प को लेकर प्रन्यासी मंडल बैठक प्रारंभ हुई।

विश्व हिंदू परिषद की हस्तिनापुर में आज से प्रारंभ हुई प्रन्यासी मंडल बैठक का शुभारंभ ब्रह्मनाथ, संघ प्रार्थना व भारत माता के चित्र पर दीपप्रज्वलन के बाद हुआ। बैठक को संबोधित करते हुए स्वामी विवेकानंद जी महाराज (गुरुकुल संस्थापक भोला की झाल) ने कहा कि जब–जब असुरी शक्तियां संगठित होती हैं, तब–तब देवशक्ति का एकत्र होना अनिवार्य हो जाता है। जिस प्रकार भगवान श्रीराम के वनगमन के समय राक्षसी शक्तियां संगठित हुई थीं, उसी प्रकार आज भी अधर्म का स्वरूप सामने है। ऐसे में धर्म की स्थापना के लिए वैदिक विचारधारा को मानने वालों का संगठित होना समय की आवश्यकता है।

उन्होंने कहा कि हस्तिनापुर की से पांचजन्य की रणभेरी बजेगी तो असुर पुनः भयभीत होंगे।

यह पावन धरा साक्षी रही है–यहीं से धर्म की स्थापना और अधर्म के विनाश का संदेश निकला था। आज उसी ऐतिहासिक भूमि पर देश–विदेश से आए वैदिक धर्मावलंबी एकत्र हुए हैं, जो आने वाले समय में असुरी शक्तियों के अंत का कारण बनेंगे। स्वामी विवेकानंद जी महाराज ने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के संस्थापक डॉ. केशव बलिराम हेडगेवार का स्मरण करते हुए कहा जब उन्होंने धर्म स्थापना के उद्देश्य से संघ की नींव रखी थी, तब एक विदेशी पत्रकार ने लिखा था कि अब विश्व को खतरा उत्पन्न हो गया है, क्योंकि वैदिक धर्म को मानने वाली शक्तियां संगठित होने लगी थीं। यह संघ का शताब्दी वर्ष चल रहा है। उन्होंने कहा कि देव शक्तियों का संगठित होना स्वाभाविक रूप से असुरों के लिए भय का कारण बनता है। उन्होंने भगवान श्रीकृष्ण का उदाहरण देते हुए कहा कि आज बालकृष्ण नहीं, बल्कि सुदर्शनधारी श्रीकृष्ण की आवश्यकता है, जो अधर्म का विनाश कर सकें। हस्तिनापुर वही धरा है, जहां से भगवान श्रीकृष्ण ने अधर्म के अंत का मार्ग प्रशस्त किया था।

स्वामी रविन्द्र कीर्ति जी ने कहा भारतीय संस्कृति में आदि काल से वैदिक परम्परा चली आ रही है जिसमे सनातन, जैन व बौद्ध इन सभी का जन्म भारत में ही हुआ है। हस्तिनापुर जैन,बौद्ध और वैदिक परम्परा के इतिहास से जुड़ा हुआ है। हस्तिनापुर में जैन परम्परा के प्रथम तीर्थकर भगवान आदिनाथ ने अयोध्या से चलकर राजा श्रेयांश से प्रथम आहार ग्रहण किया। भगवान आदिनाथ ने संसार का कल्याण करने का कार्य किया आज विश्व हिंदू परिषद के कार्यकर्ता उसी कार्य को कर रहे हैं ।

विश्व हिन्दू परिषद के अंतर्राष्ट्रीय महामंत्री श्रीमान बजरंग बांगड़ा जी ने कहा विश्व हिंदू परिषद के ६१ वर्षों का उपक्रम यही रहा कि सम्पूर्ण विश्व में शांति हो। असुर सतयुग, त्रेता एवं द्वापर में भी थे और आज भी हैं। बस उनका स्वरूप बदल गया है, आज असुर संगठित है, हमे सुप्त अवस्था में पड़ी अपनी देवसेना (सात्विक शक्तियों ) का जागरण करना है ओर संतों के आशीर्वाद से विजयी होना है।

उन्होंने कहा परिवारों में संस्कार के अभाव में श्रद्धा का भाव कम हो रहा है, परिवारों में संस्कार बढ़े इसके लिए हमारे विभिन्न कार्यक्रम चल रहे है। विश्व की अनेकों संस्कृति समाप्त हो चुकी हैं,

लेकिन सनातन अपनी कुटुंब व्यवस्था कारण आज भी टीका है। संस्कारों की कमी से  कुटुंब टूट रहे हैं। इस दिशा में संगठन कार्य कर रहा है जिसका परिणाम शीघ्र मिलना शुरू हो जाएगा।उन्होंने परिवारों में संख्या बढ़ाने पर जोर देते हुए कहा वामपंथी विचारधारा ने कट्टरता का चोला छोड़ उदारवाद का चोला पहन पूरे विश्व को भ्रमित किया जा रहा है। हमारा जोर है किस प्रकार भारतीय संस्कृति एवं संस्कारों को बचाया जा सके ।

राम मंदिर आंदोलन से लेकर प्राण प्रतिष्ठा एवं ध्वजारोहण तक समाज ने हमे अपना आशीर्वाद दिया। हमारा मथुरा काशी का विषय सही दिशा में आगे बढ़ रहा है। जिस प्रकार हमने राममंदिर का लक्ष्य पूरा किया उसी प्रकार हम संतों के आशीर्वाद से मथुरा एवं काशी को प्राप्त करेंगे।

इस वर्ष वंदे मातरम् के १५० वर्ष पूरे हो रहे हैं। इस गीत ने आजादी की लड़ाई में अनेकों वीरो को प्रेरणा देकर स्वतंत्रता संग्राम में मुख्य भूमिका निभाई है। हिंदू बहुसंख्यकों ने अल्पसंख्यकों को कभी पीड़ित नहीं किया। उस समय के अनुसार सही सोच कर उनको ये अधिकार संविधान ने दिए होंगे, लेकिन आज़ उनकी जनसंख्या २२ से २५ करोड़ हो गई है। अब अल्पसंख्यक के अधिकारो का दुरुपयोग किया जा रहा है। अब अल्पसंख्यकों की परिभाषा पुनः बदलने की आवश्यकता है।

संघ के १०० वर्षी के जागरण को कैसे बढ़ाया जाए। प्राचीन गौरव मथुरा एवं काशी पर समाज को संगठित करके निर्णय लिए जाए क्योंकि सामूहिक चर्चा सामूहिक निर्णय लेकर आगे बढ़ने  की हमारी संस्कृति रही है।

संगठन के एक वर्ष के कार्यवृत्त को देते हुए अंतर्राष्ट्रीय महामंत्री ने बताया इस वर्ष हमने २६३४६७ गौ माताओ को बचाया,ब२१४६७ लोगो को अपने मूल धर्म में वापस लेकर आए, ३४९९२७ लोगो को धर्मांतरण से बचाया,११६५४ युवाओ को रोजगार दिया एवं त्रिशूल दीक्षा के माध्यम से एक लाख से ज़्यादा युवाओ को जोड़ा।

उद्घाटन सत्र में मंच पर पधारे परम पूज्य संत  श्री स्वामी विवेकानंद जी महाराज, पूज्य संत स्वामी रविंद्र कीर्ति जी महाराज, केंद्रीय अध्यक्ष श्रीमान आलोक कुमार जी, केंद्रीय उपाध्यक्ष श्री राम तीर्थ न्यास क्षेत्र के महामंत्री आदरणीय चंपत राय जी, माननीय केंद्रीय उपाध्यक्ष सुशील जी, केंद्रीय उपाध्यक्ष मोहन मांगनानी जी, डॉक्टर विजयलक्ष्मी जी, केंद्रीय उपाध्यक्ष माननीय ओमप्रकाश जी सिंघल, केंद्रीय महामंत्री बजरंग लाल बागड़ा जी,  केंद्रीय संगठन मंत्री माननीय मिलिंद परांडे जी, माननीय केंद्रीय कोषाध्यक्ष रमेश गुप्ता जी, मनोज अरोड़ा जी, दीपक राज गोयल जी, सहित माननीय मेरठ प्रांत अध्यक्ष चौधरी अमन सिंह जी, मेरठ प्रांत मंत्री माननीय राजकुमार जी मंच पर उपस्थित रहे।

केंद्रीय अधिकारी व प्रन्यासी प्रतिनिधियों का हुआ भव्य स्वागत

उद्घाटन सत्र से पूर्व पहुंचे सभी केंद्रीय अधिकारियों व प्रन्यासी प्रतिनिधियों का दिगंबर जैन मंदिर जम्बूद्वीप परिसर में पगड़ी पहना व अंगवस्त्र पहनाकर, ढोल नगाड़ों व पुष्प वर्षा कर भव्य स्वागत किया गया। इस दौरान केंद्रीय मंत्री दिनेश उपाध्याय, प्रांत संगठन मंत्री अरुण कुमार, प्रांत मंत्री राजकुमार डूंगर, सर्वव्यवस्था प्रमुख प्रेम कुमार, सह प्रमुख निवेश वशिष्ठ आदि ने सभी व्यवस्थाओं को संभाले रखा।

परिसर हुआ भगवा मय : विश्व हिंदू परिषद की सुरक्षा व ध्वज व्यवस्था में लगी टोली ने प्रन्यासी मंडल की बैठक से पूर्व पूरे परिसर को भगवा ध्वज लगाकर भगवा में कर दिया गया। परिसर गेट, परिसर मार्ग, बैठक मंडप तक सैकड़ो ध्वज लगाए गए।

**जारीकर्ता : विजय शंकर तिवारी**

**अखिल भारतीय प्रचार प्रसार प्रमुख**

---

# सोलापुरात पूर्व विभाग राम मंदिरामध्ये महाआरती

शौर्य दिनानिमित्त सोलापुरात पूर्वविभाग राम मंदिरांमध्ये महाआरती पार पडली. यावेळी हभप अभिमन्यू महाराज डोंगरे, पुरुषोत्तम उडता, संजय जमादार, बाबू गिरगल, नरेंद्र काळे, जगदीश कर्रे, अविनाश कैयावाले, राजेश मनसावाले, जय साळुंके यांच्यासह मोठ्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते. याशिवाय वळसंग शहरातही उत्स्फूर्तपणे  युवकांनी महाआरती केली.

पंढरपूर, अकलूज, नातेपुते/दहीगाव, करकंब, करमाळा  येथे हिंदू शौर्य दिनानिमित्त  विहिंप बजरंग दल, दुर्गा वाहिनीच्या वतीने महआरतीचे कार्यक्रम झाले. दहीगाव येथे व्यसनमुक्ती अभियान विभाग संयोजिक प्रगती नाकुरे यांनी घेतले. अकलूज येथे जिल्हा सहमंत्री शिवाजी घोडके यांनी हनुमान चालीसा  व महाआरती केली. तर करकंब येथे बजरंग दल  गोरक्षा विभाग प्रमुख आकाश धोत्रे यांनी शेकडो युवकांच्या उपस्थितीत महाआरती केली. करमाळा पांडे येथे प्रखंड संयोजक लिंगेश्वर तटके व अण्णासाहेब गोसावी यांनी नशामुक्तीचा कार्यक्रम घेतला.

विश्व हिंदू परिषदेने शौर्य दिनाच्या निमित्ताने विश्व हिंदू परिषद बजरंग दल तर्फे माधव प्रखंडामध्ये सोमवारी विविध मंदिरांमध्ये महाआरती पार पडली. महाआरतीचे आयोजन प्रखंड मंत्री कृष्णा देशपांडे, बजरंग दल सुरक्षा प्रमुख राजू मनसावाले, देविदास सत्तारवाले, दिगंबर बडूरवाले व विकास कुलकर्णी यांनी केले.महाआरतीसाठी विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार यांचे मार्गदर्शन लाभले व सहसंयोजक अभय कुलथे, प्रवीण जिल्हा यांची उपस्थिती होती. यासाठी मंदिराचे पुजारी सागर म्हेत्रे, हरीश मैत्राणी यांनी परिश्रम घेतले.

माधव प्रखंडातील हनुमान मंदिर, स्वागत नगर, केंगनाळकर शाळेजवळ सायंकाळी ६. ३० वाजता हनुमान मंदिर, पारशी विहीरजवळ सायंकाळी ७. १५ वाजता आणि हनुमान मंदिर, डॉ. भांगे दवाखान्याजवळ रात्री ८.३० वा. महाआरती पार पडली. यावेळी धर्मप्रेमी माताभगिनी, दुर्गा आणि बजरंगी प्रचंड संख्येने उपस्थित होते. गीता जयंती. ६ डिसेंबर १९९२ रोजी बाबरी ढाँचा भुईसपाट झाला. तमाम हिंदूंच्या शौर्याचा दिवस. त्या स्वाभिमानाचा जागर करणेसाठी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने शौर्य दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्त मंदिरांमध्ये सामूहिक आरती आणि अन्य उपक्रमांचे आयोजन विहिंपतर्फे करण्यात आले होते. सौगंध राम की खाते है, मंदिर भव्य बनायेंगे हा संकल्प अयोध्या रामजन्मभूमीच्या ठिकाणी केला होता. अखेर मंदिर वही बनायेंगे, मंदिर भव्य बनायेंगे। याची देही, याची डोळा हा संकल्प २२ जानेवारी २०२४ रोजी पूर्णत्वास नेला

**विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री विहिंप, प.महाराष्ट्र प्रांत.**

## हिंदू शौर्य दिनानिमित्त विहिंपतर्फे बार्शीत महाआरती।

### शहरात पोलिसांच्या रूट मार्चने वेधून घेतले लक्ष।।

मुघलों के छाती पर भगवा लहराया है। कब्र से उठकर देख ले बाबर मंदिर वही बनाया है। सोलापूर, पंढरपूर, अकलूज, नातेपुते, करकंब, करमाळा, वळसंगमध्येही महाआरतीनिमित्त हिंदू युवकांचा जागर

६ डिसेंबर १९९२ हिंदू शौर्य दिनानिमित्त सोलापूर, बार्शी, वळसंग या शहरांमध्ये शनिवारी ६ रोजी रोजी हिंदू स्वाभिमान व पराक्रमाचा जागर करणेसाठी विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या वतीने शौर्य दिन महाआरती करण्यात आली. यानिमित्त मंदिरांमध्ये सामूहिक आरती आणि अन्य उपक्रमांचे आयोजन केले होते.



अयोध्या रामजन्मभूमी बंदीवासातून मुक्त करण्यासाठी सौगंध राम की खाते है, मंदिर वही बनायेंगे हा संकल्प हिंदू समाजाने केला होता. अखेर मंदिर वही बनायेंगे, मंदिर भव्य बनायेंगे। ही स्वप्नपूर्ती झाली, असे विहिंपचे विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे यांनी सांगितले.

१९९२ मध्ये साडेपाचशे वर्षांचा बाबरी ढाँचा भुईसपाट करून कलंक पुसून हिंदूंनी पराक्रम केला. स्वाभिमानाचा हा दिवस. शौर्य,पराक्रमाचा दिवस. या निमित्ताने विश्व हिंदू परिषद बजरंग दलातर्फे बार्शी शहरात हनुमान नगर संकटमोचन मंदिरात पत्रकार विजयकुमार पिसे,जिल्हा सहमंत्री बापूसाहेब कदम,प्रखंड मंत्री अमर शुक्ला यांच्या हस्ते महाआरती झाली. शत्रूला घुसकर मारेंगे। ही छत्रपती शिवरायांची नीती हिंदू समाजाने कायम लक्षात ठेवावी,जेणेकरून कुणीही आपल्या नादाला येणार नाही, असा समर्थ आणि सामर्थ्यवान समाज झाला पाहिजे,असे आवाहन पिसे यांनी युवकांना उद्देशून केले. महाआरतीप्रसंगी उपस्थित अडीचशे तरुणांनी हिंदू जागर केला. दरम्यान महाआरतीनिमित्त बार्शी पोलिसांनी हनुमान नगर भागात रूट मार्च काढला होता. पोलिसांच्या या रूट मार्चने बार्शीकरांचे लक्ष वेधून घेतले होते.

**पंगत चुकली तर एक वेळेचे जेवण चुकेल, पण संगत चुकली तर आयुष्याची दिशा चुकते... यासाठी योग्य माणसं बरोबर असणं गरजेचे असते...!**




# दिनदर्शिका प्रकाशन सोहळा २०२६

रविवार दि.१४ डिसेंबर २०२५ रोजी सायं ७ वा, सावरकर अध्यसन केंद्र डेक्कन पुणे या ठिकाणी विश्व हिंदू परिषदेच्या २०२६ वर्षातील दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा अत्यंत उत्साह व चैतन्यमय वतावरणारत संपन्न झाला.

त्रिवार ओंकार, एकात्मता मंत्र व विजय महामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात करून उपस्थित अतिथी श्री हेमंतजी हरहरे व ह.भ.प श्री चेतनानंद महाराज पुणेकर यांचा सन्मान पुणे पूर्व विभाग मंत्री श्री धनंजयजी गायकवाड व पश्चिम विभाग सहमंत्री श्री अतुलजी सराफ यांच्या हस्ते करण्यात आला.

यानंतर प्रांत मंत्री श्री किशोरजी चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिनदर्शिका बनवताना विचारात घेतले घटक, तिचे वैशिष्ट्य, आणि संपूर्ण संघटना आयमांसह प्रत्येक घरात या दिनदर्शिके मार्फत पोहोचेल याची १००% खात्री करून दिली.

श्री हेमंतजी हरहरे यांनी दिनदर्शिका आणि संघटनेचे ३६५ दिवस निरंतर सुरू असलेले कार्य यावर माहिती दिली. संघटनेच्या कार्यकर्त्यांने कशा पद्धतीने कार्य केले पाहिजे, कोणत्या गोष्टी टाळून कोणत्या गोष्टी अंगीकृत केल्या पाहिजे याचा उदाहरणांसह दाखला देऊन सर्वांना कार्यप्रेरीत करण्याचे काम केले.

शेवटी आदरणीय ह.भ.प श्री चेतनानंद महाराज यांनी हिंदू पंचांगाचे महत्व, तिथी व नक्षत्रांनुसार मानवी जिवनावर होणारा त्याचा वैज्ञानिक परिणाम अगदी नेटक्या शब्दांत समजावुन सांगितला.याचबरोबर संघटनेच्या कार्याचे कौतुकही केले. व पुढील सर्व उपक्रमात याच आनंदाने सर्वांसोबत मी उभा आहे असे ते सांगायला विसरले नाहीत.

यानंतर निखीलजी कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन प्रकट केले. अमितजी जोशी यांनी वंदे मातरम व राष्ट्रीय जयघोष घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. व उपस्थितांना दिनदर्शिकेचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमास रा.स्व.संघ प्रांत कार्यकारणी सदस्य श्री हेमंतजी हरहरे, पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री श्री किशोरजी चव्हाण, प्रांत मठ मंदिर अर्चक पुरोहित श्री धनाजी शिंदे, धर्मयात्रा प्रमुख अशोकजी येलमार, प्रांत समरसता प्रमुख श्री निखीलजी कुलकर्णी तसेच पूर्व विभाग मंत्री धनंजयजी गायकवाड, पुणे पश्चिम विभाग सहमंत्री श्री अतुलजी सराफ या समवेत दोन्ही विभागातील सर्व जिल्ह्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

वृत्तांकन – शुभम हरिभाऊ मुळूक




# दिनदर्शिका प्रकाशन

विश्व हिंदू परिषद ॐ पश्चिम महाराष्ट्र प्रांत यांचे वतीने दरवर्षी प्रकाशित होणारे दिनदर्शीका २०२५ प्रकाशन केन्दीय प्रन्यासी मण्डल बैठक प्रसिद्ध जैन धार्मिक तीर्थक्षेत्र जम्बूदीप, हस्तीनापूर मेरठ येथे विश्व हिंदू परिषद आंतरराष्ट्रीय अध्यक्ष ॲड अलोककुमारजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्व सरकार्यवाह तथा विशेष हिंदू परिषद पालक आदरणीय भैय्याजी जोशी, आंतरराष्ट्रीय महामंत्री मा बजरंग जी बागडा, केंद्रीय संघटन मंत्री मा मिलींद जी परांडे, केंद्रीय सहमंत्री प पू दादाजी वेदक, मुंबई क्षेत्र मंत्री मा रामचंन्द जी रामुकाजी, क्षेत्र सह मंत्री मा प्राचार्य अनंतजी पांडे, संघटन मंत्री मा अनिरुद्ध पंडीत, यांचे शुभहस्ते प्रकाशित करण्यात आली. यावेळी प्रांत मंत्री मा किशोरजी चव्हाण, प्रांत सह मंत्री ॲड सतिश गोरडे, प्रांत सह मंत्री मा नितीनजी वाटकर उपस्थित होते. या दिनदर्शीकेव्दारा हिंदू पंचांगाची माहिती देण्यात येते. सलग १९८५ पासून दरवर्षी १५००० पेक्षा प्रति प्रकाशित करण्यात येतात व संपूर्ण प्रांतांत ग्रामस्तरावर देण्यात येतात.



# गाय ही समरसतेचे प्रतीक : कुदळे

**गायीच्या दुधासह गोमूत्रापासून पंचगव्यातून १०९ प्रकारची औषधे**

पुणे: ज्यांनी गायीचा प्रतिपाळ केला, त्यांना दुधासह आयुर्वेदिक महत्त्व असलेले पंचगव्य देणारी गाय ही सामाजिक समरसतेचे प्रतीक आहे, असे विचार विश्व हिंदू परिषद मुंबई व कर्णावती क्षेत्र गोरक्षा प्रमुख श्री. भाऊराव कुदळे यांनी वीर बाजी पासलकर सभागृह, सिंहगड रोड येथे व्यक्त केले. विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत गोरक्षा एवंम गोसंरक्षण, सेवा, समरसता व धर्मप्रसार या आयामामधील जिल्हा प्रमुख आणि जिल्हा सहमंत्री यांच्यासह कात्रज, सिंहगड, पर्वती आणि विद्यापीठ भागातील सामाजिक पुंजातील सेवा, समरसता, गोरक्षा एवंम गोसंरक्षण, धर्मप्रसार व प्रसार या आयामाचे पदाधिकारी यांना मार्गदर्शन करताना भाऊराव कुदळे बोलत होते.

याप्रसंगी विश्व हिंदू परिषद प्रांत सहमंत्री ॲड. सतीश गोरडे, नितीन वाटकर, केतन घोडके, दिनेश लाड, निखील कुलकर्णी, डॅा शर्वरी यरगट्टीकर उपस्थित होते. भाऊराव कुदळे पुढे म्हणाले की, गाय वाचली तर शेतकरी वाचेल आणि शेतकरी वाचला तर गाय वाचेल; कारण या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. गायीच्या दुधासह गोमूत्र यांपासून निर्माण होणाऱ्या पंचगव्यातून सुमारे १०९ प्रकारची औषधे तयार केली जातात. यासाठी सेवा विभागाने एखाद्या शेतकर्याच्या शेतात बैठकीचे आयोजन करून गायी पाळणार्या शेतकर्याला सन्मानित करावे. मुस्लीम समाजातील काही व्यक्तींनीही गोशाळा उभारल्या आहेत; कारण जातपात, धर्म या सर्व भेदांच्या पलीकडे सर्वांना गोपालनाचे अनेक लाभ होतात म्हणून गाय खर्या अर्थाने समरसतेचे प्रतीक आहे.

प्रारंभी कै. वसंत सराफ आणि कै. अरविंद विभुते यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ॲड. सतीश गोरडे यांनी प्रास्ताविकातून सामाजिक पुंज आयामाचे कार्य याची माहिती दिली. नितीन वाटकर यांनी सेवा, समरसतेव्दारे आपण समाजातील विविध समस्या जाणून सेवा देऊ शकतो असे सांगितले. यावेळी डॉ. शर्वरी यरगट्टीकर, समरसता प्रांत प्रमुख निखिल कुलकर्णी, गोरक्षा एवंम गोसंरक्षण प्रांत सहप्रमुख भानुदास बर्गे, धर्मप्रसार प्रांत संचातील अमर सातपुते, प्रचार, प्रसार प्रांत सहप्रमुख संजय गोडबोले आणि निनाद गायकवाड यांनी आयामाची माहिती दिली. यावेळी मान्यवरांसह सहभागी कार्यकर्त्यांनी महाराणा प्रताप गोशाळेची पहाणी केली, यावेळी पद्मश्री गिरीश प्रभुणे, धनंजय गावडे, किरण शिंदे, संभाजी बालघरे उपस्थित होते. विभाग सहमंत्री दिनेश लाड यांनी सूत्रसंचालन व आभार अतुल सराफ यांनी केले.

# क्षात्रतेज आणि ब्रह्मतेजाचा समन्वय

**– रमेश पतंगे**

अयोध्येतील भव्य राम मंदिराच्या शिखरावर धर्मध्वज अवरोहणाचा पवित्र कार्यक्रम वेद मंत्राच्या उच्चारात २५ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झाला. डिसेंबर १९९२ मध्ये रामजन्मभूमी स्थानावर एक छोटे मंदिर बांधले गेले. २२जानेवारी २०२४ मध्ये छोट्या मंदिराचे भव्य मंदिरात रुपांतर झाले आणि मंदिरात रामलल्ला दिव्य तेजाने विराजमान झाली. आधी पाया मग कळस आणि कळसावर ध्वजारोहण या क्रमाने भारतीय अस्मितेचे राम मंदिर उभे राहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरसंघचालक मोहनजी भागवत यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. नरेंद्र मोदी हे क्षात्रतेजाचे प्रतीक आहेत आणि मोहनजी भागवत ब्रह्मतेजाचे प्रतीक आहेत. भारताचा इतिहास हे सांगतो की, जेव्हा क्षात्रतेज आणि ब्रह्मतेज यांचा समन्वय होतो तेव्हा राष्ट्र स्वबोध जागृतीने उभे राहते. क्षात्रतेजाचे कार्य सुख, शांती, समृद्धी, संरक्षणसिद्धता आणि पराक्रम करण्याची असते. आणि ब्रह्मतेजाचे कार्य सर्व विश्वकल्याणकारी ब्रह्मतेज प्रकट करण्याचे असते, या दोघांचा समन्वय म्हणजे राष्ट्रीय अस्मिता होय. प्रभू रामाच्या काळात क्षात्रतेजाचे प्रकटन रामाने केले, ब्रह्मतेजाचे प्रतिनिधित्व विश्वामित्र आणि वशिष्ठ यांनी केले. नंतरच्या काळात चंद्रगुप्त मौर्याने क्षात्रतेज प्रकट केले. आर्य चाणक्याच्या ब्रह्मचैतन्याची साथ त्याला लाभली. विजयनगरचे साम्राज्य हरिहर, बुक्कराय आणि विद्यारण्य स्वामी यांच्या समन्वयाने झाले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला संत तुकाराम आणि रामदास स्वामी यांचे आशीर्वाद लाभले, ही आमची परंपरा आहे. ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज यांच्या समन्वयातून राष्ट्रतेज प्रकट होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी दिवसरात्र कष्ट करुन राज्य विकासाच्या महायज्ञात गुंतलेले आहेत. राष्ट्र परमवैभव संपन्न होण्यासाठी भौतिक विकास अत्यंत आवश्यक आहे. आपल्या राज्यात कुणी भुकेला राहू नये, कुणी वंचित .राहू नये, दुर्बल राहू नये. सन्मानाने जीवन जगता येईल अशा सोयी त्याला उपलब्ध झाल्या पाहिजेत, हे कार्य नरेंद्र मोदी न थकता निरंतर करीत राहिले आहेत. पण ते तिथेच थांबले नाहीत. ते हे जाणून आहेत की, केवळ भौतिक समृद्धी हे आपल्या

राष्ट्राचे आत्मतत्व नाही. उत्कर्ष आणि श्रेयस हातात हात धरून केले पाहिजेत. आपल्या राष्ट्राचे अमरत्व त्यात आहे. जगाचा इतिहास हे सांगतो की, समृद्ध देश उभे राहतात, काही काळ जगावर प्रभुत्व निर्माण करतात आणि नंतर लयाला जातात. भारत मात्र गेल्या दहा हजार वर्षापासून आपल्या अक्षय धर्म उर्जेने ताठ उभा आहे. जेव्हा आपण स्वबोध विसरतो तेव्हा पतनाचा कालखंड सुरु होतो. आपली बुद्धी खराब होते. हीनभाव निर्माण होतो. अशा कालखंडातही साधु संत सत्पुरुष धर्म जागृत ठेवण्याचे काम करतात आणि इतिहासाच्या एका वळणावर धर्मचक्र पुन्हा एकदा गतिमान होते आणि उत्थानाचा कालखंड सुरु होतो. या उत्थानाच्या कालखंडातून आपण जात आहोत. नरेंद्र मोदी क्षात्रतेजाचे प्रतीक आहेत आणि मोहनजी भागवत ब्रह्मतेजाचे प्रतीक आहेत. या समन्वयातून युगधर्माचे प्रकटीकरण होत असते. हा युगधर्म एकाच वेळी समरस समाजजीवन निर्माण करणारा, सर्व प्रकारची भौतिक समृद्धी निर्माण करणारा आणि स्वसंरक्षणसिद्ध असतो. त्याचवेळी तो विश्वकल्याणकारी, विश्व पर्यावरणरक्षक, आणि व्यक्तीचा कर्तव्यभाव जागृतीचाही असतो. आपले शास्त्रवचन असे आहे, यतो धर्मः ततो जयः। जेथे धर्म आहे, तेथे विजय आहे. राममंदिरावरील धर्मध्वज हे सांगतो की, येणारा कालखंड हा आसूरी शक्तीवर विजयच विजय मिळविणारा कालखंड राहणार आहे.

## हा ध्वज, भारतीय सभ्यतेच्या पुनर्जागरणाचे प्रतीक : मोदी

### अयोध्येत राम मंदिरावर धर्मध्वज फडकला

अयोध्या : प्रभू श्रीरामाच्या नगरीत आज इतिहास घडला. दीर्घकाळाच्या प्रतीक्षेनंतर उभारण्यात आलेल्या भव्य श्री राम मंदिराच्या शिखरावर धर्मध्वज फडकावण्याचा सोहळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडला. भारताच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक परंपरेसाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या या कार्यक्रमाला उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. अयोध्येतील वातावरण भावभक्तीने भारलेले होते आणि लाखो रामभक्त या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार बनले. अयोध्या आज भारताच्या सांस्कृतिक चेतनेचं प्रतीक असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. आजची अयोध्या ही केवळ भौगोलिक नगरी नाही, तर भारताच्या सांस्कृतिक चेतनेचं प्रतीक बनली आहे. भारतासह संपूर्ण विश्व राममय झालं आहे. शतकानुशतकांच्या तपश्चर्येला आणि संघर्षाला आता समाधान मिळत आहे. राम मंदिराच्या बांधकामाचा प्रवास हा केवळ धार्मिक किंवा राजकीय नाही तर भारतीय समाजाच्या श्रद्धा, संस्कृती आणि एकतेचं प्रतिनिधित्व करणारा आहे. शतकानुशतकांच्या वेदनांना आज पूर्णविराम मिळतो आहे. आज त्या यज्ञाची पूर्णाहुती झाली, ज्याचा अग्नि ५०० वर्षे प्रज्वलित होता. धर्मध्वज फडकावल्यानंतर पंतप्रधानांनी त्याच्या प्रतीकात्मक अर्थावर विशेष भर दिला. आज मंदिरावर स्थापन झालेला हा धर्मध्वज केवळ भगवा कापडाचा तुकडा नाही. हा भारतीय संस्कृती आणि सभ्यतेच्या पुनर्जागरणाचा ध्वज आहे, असे ते म्हणाले. भगवा रंग, सूर्यचिन्ह आणि कोविदार वृक्ष यांच्या उपस्थितीचे अर्थ स्पष्ट करत त्यांनी सांगितले. हा ध्वज रामराज्य तेजाचा आणि कीर्तीचा प्रतीक आहे. संघर्षापासून सृजनाकडे झालेल्या प्रवासाची गाथा म्हणजे हा धर्मध्वज होय.

मोदी पुढे म्हणाले की, हा ध्वज पुढील शतकांपर्यंत प्रभू रामाच्या आदर्शांचे आणि सत्य-धर्माच्या सिद्धांतांचे स्मरण करून देत राहील. सत्यमेव जयतेचा हा ध्वज आहे, सत्यच ब्रह्माचं स्वरूप आहे याची घोषणा हा ध्वज करतो. तसेच प्राण जाए पर वचन न जाई या मर्यादा पुरुषोत्तम रामाच्या जीवनसूत्राची प्रेरणा म्हणून हा धर्मध्वज उभा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंदिराच्या शिखरावरील ध्वजाला नमस्कार तेवढेच होते. रामलल्लाच्या जन्मभूमीच्या दर्शनाची अनुभूती देण्याचं सामर्थ्य या धर्मध्वजात असल्याचे त्यांनी नमूद केले. यासोबतच, हा धर्मध्वज प्रभू रामाचे आदर्श, त्यांचे नैतिक मूल्ये आणि त्यांची नीति सार्या जगापर्यंत पोहोचवणारा आहे.

राम भक्तांना मोदींचा संदेश...

सोहळ्याच्या शेवटी पंतप्रधान मोदींनी देशभरातील आणि जगभरातील रामभक्तांना शुभेच्छा दिल्या. जगभरातील कोट्यवधी रामभक्तांचा आजचा आनंद अवर्णनीय आहे. या अविस्मरणीय क्षणाचे मी सर्वांना अभिनंदन करतो, असे म्हणाले. ज्यांनी ज्यांनी मंदिर निर्मितीसाठी योगदान दिलं, त्या प्रत्येकाला मी हृदयपूर्वक प्रणाम करतो, असेही ते म्हणाले. अयोध्यात वातावरण राममय..

धर्मध्वज फडकावताना अयोध्येत मंत्रोच्चार, शंखनाद, ढोल-ताशांचा नाद आणि 'जय श्रीराममच्या घोषणांनी आसमंत दुमदुमला. मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होती. संपूर्ण शहर फुलांच्या आरासने, भगव्या पताकांनी आणि दिव्यांनी सजवण्यात आले होते. अनेकांच्या मते, हा क्षण राम मंदिराच्या बांधकामानंतरचा सर्वात मोठा धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा आहे.

ऐतिहासिक घडामोडींचा अध्याय...

राम मंदिर उभारणी हा आधुनिक भारतातील सर्वात महत्त्वपूर्ण अध्यात्मिक आणि सांस्कृतिक टप्पा मानला जातो. आज फडकवलेला धर्मध्वज या प्रवासाचा नवा अध्याय सुरू करत असल्याची भावना अनेक भक्तांनी व्यक्त केली. या सोहळ्याने केवळ भारतीयांना नव्हे, तर जगभरातील हिंदू समाजाला एकत्र आणल्याचा अनुभव उपस्थितांनी यावेळी सांगितला. **वृत्त संकलन : विजयकुमार पिसे**



## गुरू तेगबहादुरजीका पराक्रम और बलिदान इतिहास नहीं भुलेगा!

### ..प्रांत मंत्री किशोरजी चव्हाण

विश्व हिंदू परिषद पर्वती भाग व मीरा सोसायटी सिंधी पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू तेगबहदूर यांच्या ३५० व्या शहिद दिनानिमित्त मीरा

सोसायटी गुरुद्वारा शंकर शेठ रोड पुणे येथे आयोजित कार्यक्रमात विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री मा. किशोरजी चव्हाण यांनी बोलताना वरील उदगार काढले. सुरुवातीला ग्यानी पद्मसिंग जी गुरुसिंग सभा यांचे किर्तन झाले.यानंतर किशोर जी चव्हाण यांनी गुरु तेगबहदूर यांच्या जीवनाविषय माहिती देतानाच विश्व हिंदू परिषदेचे कार्य सांगितले.

श्री गुरु तेगबहादुरजी यांनी हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आपले बलिदान दिले , तो दिवस होता २४ नोव्हेंबर १६७५ ! आपल्या वयाच्या ५४ व्या वर्षी त्यांनी आपल्या तीन शिष्यसहित दिलेले बलिदान आज त्या घटनेला ३५० वर्षे पूर्ण झाली आहेत.हिंद दी चादर,धर्म दी चादर या नावाने प्रसिद्ध असणारे शीख पंथांचे नववे गुरु होते. मूळ नाव त्यागमल असलेले गुरू आध्यात्मिक विद्वान होते आणि कवी होते, त्यांचे पवित्र श्रीगुरुग्रंथ साहिब मध्ये ११५ भजन आहेत.त्यांनी जिथे जिथे प्रवास केला ती सर्व क्षेत्रे पवित्र झाली असून आज तेथे प्रसिद्ध गुरुद्वारे उभी आहेत.त्यांच्या तीर्थयात्रेत अनेक शिष्य भेटायचे ,त्या दरम्यान शिष्यांकडून मिळालेले धन ते आपल्या गरीब शिष्यांमध्ये दान करायचे.

सन १६४० नंतर ते आपल्या पिता गुरु हरगोविंद सिंग आणि माता नानकीदेवी आणि पत्नी समवेत अमृतसर मधील आपली बकाला गावात वास्तव्य केले होते.गुरुहरगोविंद सिंग यांना त्यांच्या शिष्यांनी पुढील गुरू कोण असेल याबाबत विचारले असता त्यांनी बाबा बकाला असे उदगार काढले होते म्हणजे आपला उत्तराधिकारी बकाल्यात मिळेल.गुरूंच्या पश्चात अनेक लोकांनी स्वतःला गुरू घोषित केले. एक व्यापारी माखन शाह व्यावसायिक यात्रे दरम्यान जहाज बुडण्याची स्थिती आली होती.त्यावर व्यापाऱ्याने वाचलो तर शीख गुरुंना ५०० सुवर्ण मुद्रा द्यायचा संकल्प केला.दुर्घटना टळल्याने तो नवव्या गुरूंच्या शोधात बकाल्यात गेले .जेवढे घोषित गुरू होते, त्यांना प्रत्येकाला दोन सुवर्ण मुद्रा दिल्या. ज्यावेळेस गुरू तेगबहादुर यांना दोन सुवर्ण मुद्रा दिल्या,त्यावर त्यांनी आशीर्वाद दिल्यानंतर गुरूंनी शाह याचा संकल्प ओळखून भेट तुमच्या संकल्प पेक्षा कमी असल्याचे सांगितले.त्यावर शाहने ५०० सुवर्ण मुद्रा गुरुजींना देऊन जोरात ओरडला गुरू लाधो रे म्हणजेच गुरु मिळाले त्यानंतर श्री गुरु तेगबहादुर नववे गुरु झाले.

औरंगजेब राज्यावर आला असता त्याने हिंदू समाजावर विविध अत्याचार चालू केले.त्याच वेळेस काश्मीर मधील पंडितांचे शिष्टमंडळ इस्लामी जाचातून मुक्त करण्यासाठी गुरुंना भेटले.त्यावर त्यांनी मला अगोदर मुसलमान करून दाखवा असा निरोप औरंगजेबाकडे पाठविला.पुढे संघर्ष वाढून औरंगजेबाने गुरुंना आणि त्यांचे तीन शिष्य भाई मतीदास,भाई दयाल दास,भाई सती दास यांना अटक केली .त्यांच्यापुढे इस्लाम स्वीकारण्याची अट घालून आपली सुटका करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला. परंतु धर्मरक्षणासाठी सुरुवातीस तीन शिष्य यांचे बलिदान झाले.तर दिल्लीतील चांदणी चौकात गुरू तेगबहादुरजी यांचे शीर शरीरापासून वेगळे केले ,आजही तेथे शीशगंज गुरुद्वारा उभा आहे.गुरूंच्या धर्मनिष्ठेपुढे औरंगजेब हरला आणि आजही हिंदू धर्म आणि विश्व हिंदू परिषद धर्मांतरण विरोधात लढत आहे. कार्यक्रमाच्या शेवटी गुरुनानक दरबार कॅम्प यांच्या माध्यमातून लंगर चे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विश्व हिंदू परिषद पर्वती भाग अध्यक्ष तुळशीराम उणेचा, भाग मंत्री नाना क्षीरसागर, भाग सत्संग प्रमुख संजय हसिजा उपस्थित होते.

---

## बजरंग दलाची नशामुक्त भारत प्रतिज्ञा

### इचलकरंजी येथे उपक्रम यशस्वी

युवक हे कोणत्याही राष्ट्राचे बळ असते, जे समाज आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात. म्हणूनच, अधिकाधिक तरुणांनी नशामुक्त भारत मोहिमेत सामील होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. देशासमोरील हे आव्हान ओळखून, आपण सर्वजण नशामुक्त मुक्त भारत मोहिमेअंतर्गत एकत्र आपल्या समाजासाठी, कुटुंबासाठी आणि मित्रांसाठीच सोबतच स्वतःसाठी देखील नशामुक्त राहण्याची प्रतिज्ञा करतो, कारण बदलाची सुरुवात आपल्या आपल्यापासून होते. या उद्देशातूनच बजरंग दल इचलकरंजी यांच्यावतीने नशामुक्त भारत उपक्रम राबवण्यात आला.

नशामुक्तची ही प्रतिज्ञा युवक हे देशाचे बळ असते, जे समाज आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात. म्हणूनच तंबाखू, जर्दा, खर्रा, ड्रग, दारू आणि धूम्रपान ह्यांच्या दुष्परिणामांची मला जाणीव आहे म्हणून मी जन्मभर, ह्या व्यसनांपासून दूर राहण्याचा संकल्प करीत आहे. कारण बदलाची सुरुवात स्वतःपासून होते..माझे कार्यालय, माझे घर, आणि माझा परिसर नशामुक्त रहावा, इतरांनी नशाजन्य पदार्थांचा परित्याग करावा ह्यासाठी मी प्रयत्न करेन. व छत्रपती शिवाजी महाराज संभाजी महाराज यांचे आदर्श मनाशी बाळगेन. माझे कार्यालय, माझे घर, माझे गाव, माझा समाज आणि माझे महाराष्ट्र राज्य मी नाशमुक्त करेन. जय श्रीराम, जय शिवराय, जय महाराष्ट्र।

## बजरंग दलाचे नशामुक्त भारत अभियान कौतुकास्पद

### पो.नि.श्री.शिवाजीराव गायकवाड यांचे उद्गार

युवक हे कोणत्याही राष्ट्राचे बळ असते, जे समाज आणि देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देतात म्हणूनच अधिकाधिक तरुणांनी विविध नशेपासून दूर रहावे यासाठी नशामुक्त भारत मोहिमेचे आयोजन बजरंग दल इचलकरंजी वतीने करण्यात आले. आपल्या राष्ट्रासमोरील विविध आव्हाने ओळखून, तरुणांनी बजरंग दल नशामुक्त भारत मोहिमे अंतर्गत एकत्र येवून आपल्या समाजासाठी, कुटुंबासाठी आणि राष्ट्रहितात कार्यासाठी योगदान द्यावे, यासाठी नशामुक्त शपथ प्रतिज्ञा घेण्यात आली. सदर कार्यक्रमाची सुरुवात भारतमाता व रामपंचायत प्रतिमेचे व शिवरायांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आले. सदर कार्यक्रम प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून छ.शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पो.नि.सो.शिवाजीराव गायकवाड, युवा उद्योजक मार्गदर्शक श्री.आशितोष पाडळे,श्री.प्रदीप धुत्रे, गौतम बागवडे, सुरेश शिंदे उपस्थित होते..००बजरंगींसाठी युवा उद्योजकता विकास कार्यक्रम स्वराज्य हे मावळ्यांमुळे आहे मावळा उपाशीपोटी लढू शकत नाही, या छत्रपतींच्या शिकवणीनुसार बजरंगींनी देव, देश, धर्माचे कार्य करताना बजरंगी स्वतःआर्थिक दृष्ट्या सक्षम असावा स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरु करून यशस्वी उद्योजक बनवा यासाठी युवा उद्योजकता विकास कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विजेता ग्रुप व बजरंगींनी विशेष प्रयत्न केले.. यावेळी उपस्थित संख्या ४८ पर्यंत होती. (छ.संभाजीनगर प्रखंड बजरंग दल इचलकरंजी जिल्हा)

# असा मित्र असा नेता पुन्हा मिळणे नाही




जन्म पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यामधील पारगाव या गावी १ ऑगस्ट १९५२ रोजीचा जन्मापासून शालेय शिक्षण म्हणजे त्या वेळेचे अकरावी पर्यंत तेथेच झाले. लहानपणापासून शेतीची आवड त्यामुळे कष्ट करण्याची सवय व ग्रामीण सहवासात राहण्याचा आग्रह होता. परंतु नोकरीच लागल्यानंतर गावाकडे कोणी अन्य भाऊ राहून शेती करण्यास तयार नसल्याने वडिलांनी सर्व जमीन जुमला विकून, मुलांस  मुलिंस त्यांचा त्यांचा वाटा देऊन ते मोकळे झाले. तसे पाहिले तर लहानपण आईच्या प्रेमळ सहवासात व वडिलांच्या  अत्यंत शिस्तीमध्ये गेले. वडील यांचे घराणे  हे कट्टर काँग्रेस वादी होते. पुण्यात पुढील शिक्षणासाठी आल्यावर त्यांचा मुक्काम त्यांच्या मामांच्याकडे शनिवार पेठेत, मोतीबागे जवळ असे. त्याच वेळी संघाशी संबंध आला. मामा हे पक्के सावरकरनिष्ठ व हिंदुत्ववादी विचारसरणीचे. त्यातून  पुण्यात आल्यावर व बँकेमध्ये लागल्यानंतर आम्हा मंडळींबरोबर बरोबर राहून तो अधिकच कट्टर संघवादी झाला. त्यात भर म्हणून सासूरवाडी ही कट्टर संघ–जनसंघाची मिळाली. त्यांच्या घरातील वातावरणामध्ये हे तिन्ही भिन्न विचारसरणीचे लोक हसत खेळत राहत होते. तीनही कुटुंबातून अनेक कार्येक्रम विचारसरणीचे आड न येता हसत खेळत पार पडत असे नेहमी सांगत असे.

बँकेची कर्मचारी संघटना तथा स्टाफ वेल्फेअर असोसिएशन च्या स्थापनेमध्ये ज्यांचा पुढाकार होता, त्यापैकी प्रामुख्याने

देवधर हे नाव घ्यावेच लागते. त्याशिवाय संघटनेचा इतिहास पूर्ण होणार नाही. संचालक मंडळावरही प्रामुख्याने माननीय वसंतराव आपटे व माननीय भानुदास जी किराड हे निवडून आले. यांच्या कालावधीत पुन्हा एकदा कर्मचारी संघटना स्थापन करण्याचा विचार सुरू झाला. त्यात प्रामुख्याने विजय देवळकर मी स्वतः, रवींद्र घाटपांडे आणि देवधर डोंगरे, सुहास जोशी, उल्हास जोशी, सुंदर गायकवाड इ. यांनी एकत्र येऊन विचार विनिमय करून बँकेच्या कर्मचाऱ्यांचेच केवळ संघटनेवर नियंत्रण राहील अशी रचना करून स्टाफ वेल्फेअर असोसिएशन या नावाने संघटनेची स्थापना केली. यात श्री. नंदकिशोर देवधर अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यातली. त्यानंतर साधारणतः दर तीन वर्षांनी सर्व कर्मचारी निवडणुकीद्वारे संघटनेसाठी पदाधिकारी निवडून देत. जवळजवळ सर्वच निवडणुकांमध्ये त्यांना कायम सर्वाधिक मते मिळत असत. त्यांना सर्वानुमते नंदकिशोर देवधर हे कायमचे साठीच अध्यक्ष म्हणून राहात गेले. .सर्वांचा कायमच तसा आग्रह असे. त्यांचा कालावधी ही अत्यंत स्फूर्तीदायक व सर्व कर्मचाऱ्यांना आत्मीयतेने बांधून ठेवणारा असा राहिला.

कर्मचारी संघटनेचा अध्यक्ष म्हणून एकीकडे जबाबदारी तर दुसरीकडे बँकेत मॅनेजर व विविध अधिकार पदे भूषवून काम करण्याची जबाबदारी ही अत्यंत कुशलतेने देवघर यांनी शेवटपर्यंत निभावली. संपूर्ण कार्यकाळा मध्ये संघटनेमध्ये व व्यवस्थापनामध्ये मत भिन्नता असली तरी कधीही मनो भेद निर्माण झाले नाहीत. झाले तर ते जागच्या जागी सोडवण्यास त्यांचा पुढाकार मोठ्या प्रमाणात असे. कायमच बँकेच्या स्थैर्याला व सुरक्षिततेला त्यांचे प्राधान्य असे ते सर्व कर्मचाऱ्यांच्या मनामध्ये ही बिंबवीत असत त्यामुळे पगार वाढ करीत असताना कधी कर्मचारी पण नाराज झाले नाहीत.

ते ज्या ज्या ब्रँचेस- शाखांमध्ये व्यवस्थापक म्हणून गेले तेथे त्यांनी डिपॉझिट मध्ये व बँकेच्या एकूण आर्थिक उलाढाली मध्ये मध्ये मोठ्या निष्काळजीपणामुळे, योग्य ती कागदपत्रे दप्तरी न ठेवल्याने काही कर्ज खाती बुडीत चालली होती. त्यातफोर्ट- मुंबई सारख्या शाखेस बुडीत गणल्या गेलेल्या अनेक कर्ज वसूल करून, बुडीत खात्यातून बाहेर काढण्यासाठी किती कष्ट धावपळ केली त्यास सीमा नव्हती. प्रसंगी मुंबई बाहेर गुजराथ चेन्नई सारख्या भागात जाऊन वसुली करण्याचे धाडस हे दाखवले ते त्यावेळी त्यांचेबरोबर काम केलेले कर्मचारी आजही कौतुकाने सांगत असतात्त. पण यासाठी संस्थेने फारशी दाखल घेतली नाही असे म्हंटले तर वावगे होणार नाही.

बँकेतील कर्मचाऱ्यांच्या साठी गृह कर्ज योजना व ती सुद्धा केवळ तीन टक्क्यांमध्ये किमान दोन वेळेला घेता येईल अशी पद्धत मान्य करून घेण्यामध्ये संघटनेचा मोठा वाटा आहे अर्थात व्यवस्थापनावर बरोबर वाटाघाटी करण्यात श्री देवधर व श्री वाणी यांचा नेहमी मोठा सहभाग व मार्गदर्शन लाभलेले आहे. पगार वाढीची मागणी करताना त्यात केवळ कर्मचाऱ्यांचे हिता बरोबर संस्थेसही वाढीव वेतनाचे ओझे त्रासदायक होणार नाही असा दृष्टिकोन ठेवूनच वाटाघाटी करीत असत. त्यातून जास्तीत जास्त वाढ कशी होईल हे बघितले जात असे. याचे अन्य बँका सुद्धा कौतुक होत असे.

बहुदा १९८१ चे वेतन करारानंतर कर्मचाऱ्यांस भरघोस पगार वाढ मिळत गेली. बँकही सहकारी बँकांमध्ये क्रमांक दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर होती.

आम्ही जेव्हा संघटनेमध्ये कार्यरत होतो तेव्हा कधीही कर्मचाऱ्यांना संप करावा लागला नाही व सर्व प्रश्न सामोपचाऱ्याने चर्चेने सुटले गृह कर्जाबरोबरच कर्मचाऱ्यांच्या साठी लिव्ह बँक, नवीन संकल्पना उदयास आणण्यामध्ये देवधर यांचा फार मोठा वाटा आहे हे मान्य करून घेण्यामध्ये व्यवस्थापनाबरोबर अनेक चर्चेच्या फेरी अथक केल्या गेल्या त्याचा हा परिणाम आज अनेक कर्मचाऱ्यांस याचा फायदा झालेला आहे व पुढे होत राहील.

कर्मचाऱ्यांचे हित बघत असतानाच सामाजिक हिताची ही जाणीव कर्मचाऱ्यांच्या मध्ये निर्माण करण्याचे मोठे काम संघटनेने केले. या कालावधीतच एकदा दुष्काळ पडला होता त्यावेळी जिल्ह्यात एके ठिकाणी गुरांची चारा छावणी चालू होती तेथेही संघटनेमार्फत मदत करण्यात आली.

दैनिक तरुण भारत पुणे यांच्या सारख्या राष्ट्रीय वृत्त पत्रावर आर्थिक संकट उद्भवल्यावर त्यांस त्यातून बाहेर पडण्यास हातभार लाभाव या दृष्टीने सर्व कर्मचारी वर्गास आवाहन केल्यावर त्यास उत्तम प्रतिसाद मिळाल्यामुळे तरुण भारत काही दिवस तरी चालू राहिला.

कोकणामधील संगमेश्वर तालुक्यातील माखजन येथील एका वाडी मध्ये पाण्याची फार मोठी अडचण होती लोकांना

डोंगर उतरून लांब वरून पाणी आणावे लागत होते त्यासाठी त्यांना गावात पाणीपुरवठा सार्वजनिक रित्या करण्याचे ठरविले. गावकऱ्यांच्या सहकार्याने डोंगर उतारावर पाणी अडवून एक टाकी बांधून त्यात पाणी गावात सार्वजनिक ठिकाणी साठत राहील अशी योजना केली. त्यातून गावात सार्वजनिक पाईपलाईन टाकून एक नळ बसवून पाणीपुरवठा करून करण्यात आला. त्यासाठी गावकऱ्यांनी ही मोठ्या प्रमाणावर सहकार्य केले.

एखादा कर्मचारी अकाली मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबावर जो दुर्धर प्रसंग उडवतो त्यातून त्या कुटुंबास बाहेर काढण्यासाठी कुटुंबातीलच एखाद्या योग्य मुलास, मुलीस आटव पत्नीस बँकेत समाविष्ट करून घेणे बाबत सुद्धा व्यवस्थापनाकडे पाठपुरावा केला व त्यास चांगल्या प्रमाणात यश आले.

आम्ही निवृत्त झाल्यानंतर आमच्या एक गोष्ट लक्षात आली की आपण स्टाफ साठी अनेक चांगल्या गोष्टी केल्या पण निवृत्तीनंतर त्यास पेन्शन अथवा मानधन स्वरूपात दरमहा काही रक्कम मिळेल अशी काही व्यवस्था करू शकलो नाही. ही खंत देवधर कायम बोलवून दाखवत असत.

संघशरण वृत्तीमुळे निवृत्तीनंतरही देवधर सार्वजनिक कामा रस घेत होते. बँकेतीलच निवृत्त अधिकारी श्री. करमरकर यांचे बरोबर विश्व हिंदू परिषदेचे प्रांताचे कोषाध्यक्ष म्हणून हे त्यांनी बराच काळ काम केले होते.

त्याचवेळी पुणे मुंबई रस्त्यावरील कामशेत या गावी विश्व हिंदू परिषदेला दोन एकर जागा एकावृद्ध दांपत्याने बक्षीस पत्राद्वारे दिली होती. त्या ठिकाणी खेडेगावातील वनवासी भागातील मुलांना तांत्रिक शिक्षण देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले व एक तंत्र ज्ञानशिक्षण केंद्र उभे केले. ते उभे करीत असताना त्या इलेक्ट्रिक कनेक्शन मिळवण्यासाठी तालुक्यातील कर्मचारी पदाधिकारी व शासकीय परवानग्या मिळवण्यासाठी पार मुंबई पर्यंत आमदार खासदार मंत्री यांच्याशी संपर्क साधून हेलपाटे मारून त्याची मान्यता मिळवली. त्यासाठी किती चक्र माराव्या लागल्या असतील तेच जाणोत.

कार्यशाळेत मुलांना प्रवेश देण्यासाठी गावोगावी जाऊन पालकांच्या व तसेच हुशार विद्यार्थ्यांच्या गाठीभेटी घेऊन त्यांची निवड करून त्यांना कामशेत येथे घेऊन येण्याचे मोठे काम त्यांनी अनेक वर्ष चालू ठेवले परंतु हे चालू ठेवण्यासाठी अपेक्षित निधीसाठीही तेच फिरवत असत चान्स इतरांकडून आवश्यक तेवढे सहकार्य मिळाले नाही असे यांचे अनेकदा बोलण्यात येत असे.त्यासाठी त्यांस अपेक्षित सहकार्य नसल्यामुळे ते थोडे वर्ष चालवून नंतर ते दुसऱ्या संस्थेकडे सुपूर्त करावे लागले.याचा खूप मोठा धक्का त्यांस सहन करावा लागला.

सन १९८३ साली सोलापूर येथे झालेल्या संघ शिक्षा वर्गात देवधर यांनी प्रथम वर्षाचे शिक्षण घेतले होते. त्यावेळी मी त्यास शिक्षक म्हणूनही होतो,. त्यानंतर बरेचदा तो विषय निघाला की मुद्दामून मला म्हणत, 'ह्या अप्पाने मला खूप छळले त्या वेळेला...' गप्पा मारताना अशी मजा ही होत असे.

एकीकडे बँकेचे काम तर एकीकडे संघटनेचे काम करीत असताना घरात आवश्यक तेवढे लक्ष दिले जात नसते त्यामुळे घरच्यांचीही तक्रार सतत होत असे त्यासाठी आम्ही एक शकल काढली वर्षातून एकदा तरी कौटुंबिक सहल काढायचे ठरवले गेले त्यानुसार पहिली सहल आणि श्री वाणी यांच्या औरंगाबाद येथील ठिकाणी काढली तेथून अजंठा वेरूळ व पैठण या ठिकाणीही कौटुंबिक सहल काढली होती.

एक वर्ष रत्नागिरी जिल्ह्यातील कर्मचारी यांनी त्यांचे एक जिल्हा संमेलन गणपतीपुळे येथे आयोजित केले होते तेथेही आम्ही सहकुटुंब गेलो होतो. नंतरची सहल ही कोकणात शिवथर घळ, हरीहरेश्वर,वेळणेश्वर गुहागर अशी केली त्यामुळे अश्या सहली कुटुंबातील वातावरण छान राहण्यास फायदेशीरच झाले असे म्हणावे लागेल.

देवधरांच्या अध्याक्षपदीच्या कार्यकाळामध्ये वर्षातून एकदा बँकेच्या सर्व शाखांमध्ये प्रत्यक्ष जाऊन कर्मचाऱ्यांची भेट घेणे सभा घेणे व काही अडचणी असल्यास त्याचे निवारण जागच्या जागी होईल असा प्रयत्न करणे असे अनेक वर्ष चालू होते. त्याचबरोबर जे विभाग पाडलेले होते त्या विभागात– जिल्हाचे ठिकाणी प्रतिनिधी सुद्धा आपापल्या ठिकाणी किमान वर्षातून एकदा जाऊन येत असत.

प्रारंभीच्या काळात संघटनेकडे मोठ्या प्रमाणावर निधी नसल्यामुळे बरेचसे दौरे हे आम्ही मोटरसायकल वरती करीत असो व राहण्याची व्यवस्था ही स्थानिक एखाद्या प्रतिनिधीच्या कर्मचाऱ्यांच्या घरी होत असे. त्यावेळी हॉटेल खर्च हा परवडणारा नव्हता बरेचदा वाटेमध्ये होणारा नाश्त्याचा जेवणाचा खर्च हा सुद्धा सर्वजण कॉन्ट्रीब्युशन काढून काढून करीत होतो. नंतर जसे वर्गणी मधून निधी वाढत गेला तसा त्यामधून खर्च करीत

असू व या सर्वांचा हिशेब प्रतिवर्षी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये दिला जात असे त्याच जोडीला सर्वांचे एकत्रित जेवण व एकत्रित कर्मचाऱ्यांचे विविध गुण दर्शनाचा, गाणे – वाद्यांचे सोलो वादन, नकला, नाट्यछटा असे कार्यक्रम करीत असू. सार्वजनिक कार्यक्रमात ज्याप्रमाणे निवेदक निवेदन करून मग गाणे सादर करतात तसे करण्याचाही आमचा प्रयत्न असे यात प्रामुख्याने श्री. रवींद्र घाटपांडे यांचा फार मोठा सहभाग असे.तो त्यांचा हातखंड विषय आहे,असे म्हटले तर वावगे होणार नाही.

त्यावेळी बँकेचे कार्याध्यक्ष असलेले माननीय विनायकराव साठे यांनी बँकेच्या संचालक मंडळातून निवृत्ती घेण्याचे ठरविल्यावर त्यांचे घरी त्यांनी सर्व संचालक व असोसिएशनचे सर्व पदाधिकारी यांचे साठी जेवणाचा कार्यक्रम ठरविला होता त्यावेळी बोलण्याच्या ओघांमध्ये त्यांनी आम्हा सर्वांना असे सुचविले की तुमची संघटना अशीच चांगली चालू राहू दे. ज्यावेळी संघटनेमध्ये फूट पडेल त्यावेळी बँकेच्या अस्तित्वालाही धोका निर्माण होऊ शकतो, इतका विश्वास एखाद्या संचालकाने कर्मचाऱ्यांच्या वरती दाखविल्याचे उदाहरण मला तरी आढळत नाही याचे सर्व श्रेय श्री देवधर व श्री वाणी यांस जाते. असे बरेच प्रसंग आज आता आठवत आहेत.

अजूनही देवधर आपला सोडून गेले हे मनास पटत नाही. गेली दोन–तीन वर्ष त्यांची प्रकृती अत्यंत कृषी होत गेली आमचे एकमेकांच्या घरी नेहमी जाणे येणे होत असे. प्रत्येक वेळी तब्येत अधिकच खालावलेली दिसत असे. मी नेहमी विचारत असे काय काय कुठल्या कुठल्या डॉक्टरांना दाखवतोयस,घरातले सर्वजणच म्हणत असतात की त्यांचे रिपोर्ट सर्व नॉर्मल आहेत. सहा महिन्यांनी तरी त्यांचे सर्व रिपोर्ट काढले जात असत आणि सर्व रिपोर्ट नॉर्मल असंत, असेल तरीसुद्धा तब्येत का बारीक होत आहे हे शेवटपर्यंत समजले नाही. शेवटच्या तपासणीमध्ये न्यूमोनियामुळे पाठीमध्ये पाणी झाल्याचे लक्षात आले ते काढल्यानंतर सुद्धा काही दिवस ICU मध्ये राहून नंतर चार दिवस बाहेर खोलीमध्ये हलवल्यानंतर तब्येत सुधारली म्हणून डॉक्टरांनी घरी सुद्धा सोडले, त्या वेळेला थोडेसे मन शांत झाले. परंतु दोन–तीन दिवसांमध्येच पुन्हा एडमिट केल्याची बातमी आली माझी तब्येत ठीक नसल्यामुळे मला पुन्हा भेटण्यास जाता आले नाही पण त्यावेळी हार्ट अटॅक येऊन त्यांनी आपला सर्वांचा निरोप घेतला. अनेकांना ही धक्कादायक बातमी होती.

देवधरांच्या बरोबर ज्यांनी ज्यांनी काम केले आहे त्या सर्वांना तर विश्वास बसणे शक्य नव्हते. शेवटी वैकुंठा मध्ये सर्व जुने सहकारी भेटले प्रत्येकाच्या तोंडी हाच विषय होता की एवढा आजार लक्षात कसा काय आला नाही. अजून ते गेले आहेत यावर विश्वास बसत नाही.

पण शेवटी नियतीने जे ठरविले असते तेच घडते आपण सर्व नियतीपुढे निष्प्रभ आहोत हेच खरे....!! सध्याचे माणसाचे एकंदरीत आयुष्यमान पाहता देवधर २७/११/२०२५ ला वयाच्या अवघ्या ७३ व्यावर्षी आपणतून निघून जावे याचे फार दुःख आहे. आपण सर्वजण त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होऊया आणि परमेश्वराने देवधरांच्या आत्म्यास सद्गती द्यावी अशी प्रार्थना करूया.

**श्रीराम कुलकर्णी**

**कोथरूड, पुणे.**

**विचारधन...**

आजकाल माणूस सतत नकारात्मक विचार आणि चिंता काळजी करताना दिसून येतो. मनातील विचारांचा नकळत तुमच्या शरीरावर परिणाम होत असतो. तुम्ही सतत नकारात्मक विचार करत असाल, तर त्यामुळे तुम्हाला शारीरिक समस्या होऊ शकतात. याउलट सतत आनंदी आणि प्रसन्न राहिल्यास मनात केवळ चांगले आणि सकारात्मक विचार येतात. सकारात्मक विचारांमुळे तुमची विचारसरणी सुधारते. तुम्ही सतत जे विचार करता त्याप्रमाणे तुमचे भविष्य घडत असते. यासाठी सतत आनंदाने विचार करा आणि हसत राहा. दैनंदिन जीवन हे दगदग आणि ताणाचे असू शकते. मात्र, या ताणाला आणि दगदगीला दूर करून रिलॅक्स व्हायचे असेल, तर दिवसभरात काही वेळ हसण्यासाठी जरूर द्या. ज्यामुळे तुमच्या शरीरातील नसा मोकळ्या होतात, रक्तप्रवाह, सुधारतो आणि रिलॅक्स वाटू लागते. शारीरिक दुखणी आणि आरोग्य समस्या दूर ठेवायच्या असतील, तर नेहमी हसत राहा, कारण हसणे हा एक उत्तम शारीरिक व्यायाम मिळतो.

# चांगल्या बातम्या

**वंदे मातरम्**

हे गीत श्री बकिंम चंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले व ७ नोव्हेंबर १८७५ रोजी ते प्रथम बंग दर्शन या दैनिकात प्रकाशित झाले. नंतर १८८२ मध्ये त्यांच्या आनंदमठ कादंबरीत ते समाविष्ट केले. हे गीत रवींद्रनाथ टागोर यांनी पहिल्यांदा १८९६ मध्ये गायले. ७ ऑगस्ट १९०५ रोजी वंदे मातरम् ही राजकीय, सामाजिक घोषणा झाली. या घोषणेने देशात देशभक्ती ची लाट उसळली. अनेक देशभक्त व क्रांतिकारकांना स्फूर्ती मिळाली. भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून वंदे मातरम् १९५० मध्ये मान्यता मिळाली.

केंद्र सरकारने ७ नोव्हेंबर २५ रोजी वंदे मातरम् ला १५० वर्षे झाल्याबद्दल दिल्लीत मोठा कार्यक्रम केला व पंतप्रधान मा. मोदीजीं च्या हस्ते पोस्टाचे तिकीट व एक नाणे यांचे विमोचन केले. त्या दिवशी देशभर सामूहिक गायन व सांस्कृतिक कार्यक्रम झाले. वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. संपूर्ण वंदे मातरम् वरती दिले आहे ते आपणही वैयक्तिक व सांधिक म्हणावे. धन्यवाद.

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) नोव्हेंबर महिन्यात देशात अनेक चांगल्या गोष्टी घडल्या. २५ नोव्हेंबर रोजी अयोध्येतील श्री राम मंदिरावर धर्म ध्वजारोहण झाले. म्हणजे मंदिराचे सर्व काम पूर्ण झाले.२७ नोव्हेंबर रोजी आपल्या मा. पंतप्रधानांनी हैद्राबाद येथील स्कायरुट या स्टार्ट अप कंपनीच्या ५ एकरावरील इन्फिनिटी कॅम्पस चे उद्घाटन केले. येथे उपग्रह प्रक्षेपकाचे आरेखन, उत्पादन व तपासणी होईल आणि दर महिन्याला एका प्रक्षेपकाचे उड्डाण होईल. कृषी क्षेत्राचे निकालही जाहीर झाले. यावर्षी भारतात ३,५७० लाख टन अन्नधान्याचे विक्रमी उत्पादन झाले. गेल्या दहा वर्षात १,००० लाख टनांनी यात वाढ झाली.

२) २१ नोव्हेंबर रोजी केंद्र सरकारने जुन्या २९ कामगार कायद्यांचे एकत्रिकरण करून व आवश्यक ते बदल करून ४ श्रम संहिता लागू केल्या.

– वेतन संहिता.

– औद्योगिक संबंध संहिता .

– सामाजिक व व्यावसायिक सुरक्षा संहिता.

– आरोग्य व कामाची परिस्थिती संहिता.

यामध्ये प्रामुख्याने खालील गोष्टी आहेत.

– कामगारांना वेळेवर व किमान वेतन.

– पहिल्या दिवसापासून नियुक्ती पत्र.

– महिलांना पुरुषांएवढे समान वेतन व आदराची हमी.

– घरपोच सुविधा देणाऱ्या कामगारांसह ४० कोटी श्रमिकांना भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा योजना वगैरे सामाजिक सुरक्षा कवच मिळणार.

– एक वर्षानंतर कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटी.

– ओव्हर टाईम साठी दुप्पट वेतन.

– ४० वर्षापुढील श्रमिकांची वार्षिक आरोग्य तपासणी. तर धोकादायक क्षेत्रातील कामगारांसाठी संपूर्ण आरोग्य सुरक्षा.

– कामगारांना अचानक संप करण्यास बंदी.

व्यवसाय सुलभतेच्या आघाडीवर भारताचा क्रमांक जगात १३४ वा आहे. या नवीन श्रमसंहिते मुळे हा क्रमांक उंचावेल. नव्या गुंतवणुकीला व नव्या रोजगार निर्मितीला ही चालना मिळेल.

३) केंद्र सरकारने व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्रॅम जाहीर केला. ज्यामध्ये सीमेलगतच्या गावांचा सर्वांगीण विकास करायचे उद्दिष्ट आहे. यामध्ये देशाच्या सीमे लगतच्या १६ प्रांत व २ केंद्रशासित प्रदेशातील ११७ जिल्ह्यातील ४५७ समूहातील सीमेलगतची खेडी अंतर्भूत आहेत. सीमेलगतच्या दुर्गम भागातील खेड्यांना पुरेशा सोयी व सुविधा देऊन त्यांच्या सुरक्षेची हमी देणे.

या अंतर्गत सर्व ऋतूंसाठी उत्तम रस्ते, दूरसंचार संपर्क व्यवस्था, विद्युतीकरण, दूरचित्रवाणी सुविधा, पर्यटन उद्योगांना प्रोत्साहन आणि सांस्कृतिक वारशाचे जतन, वैद्यकीय शिबिरे, जागरूकता मोहीम आणि स्थानिक

अर्थव्यवस्थेला चालना देण्यासह राष्ट्रीय एकात्मता बळकट करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पहिला टप्पा १५ फेब्रुवारी २३ रोजी जाहीर केला. त्यासाठी २०२२-२३ ते २०२५-२६ पर्यंत ४,८०० कोटी रुपये खर्चाला मंजुरी दिली. यामध्ये प्रामुख्याने अरुणाचल, हिमाचल, सिक्कीम, उत्तराखंड व लडाख प्रांत होते. आणि आता दुसरा टप्पा २०२५-२६ ते २०२८-२९ या कालावधीत राबवला जाणार आहे. त्यासाठी ६,८२९ कोटी रुपये खर्चाला मान्यता दिली आहे. यामध्ये प्रामुख्याने जम्मू-काश्मीरमधील ४३ सीमावर्ती तालुक्यातील १२४ गावांचा समावेश आहे. ही सर्व गावे म्हणजे सुरक्षिततेचे डोळे व कान असावेत, असा प्रयत्न असेल.

४) मंगळवारी २ डिसेंबर रोजी डीआरडीओ ने लढाऊ विमानातील वैमानिकाची आपत्कालीन काळात सुटका करण्याच्या भारतीय प्रणाली ची यशस्वी चाचणी घेतली. चंदीगड मध्ये चाचणी साठी बनवलेल्या रेल्वे मार्गावर ही चाचणी झाली. ८०० किमी प्रति तास वेगाने जाणाऱ्या विमानातील वैमानिकांच्या सुटकेसाठी ही प्रणाली आहे. यामध्ये कॅनोपी (विमानाचे काचेचे छत) काढणे, वैमानिकाचे उड्डाण आणि त्यांचे पॅरॅशूट मधून खाली उतरणे केले जाते. अशी प्रणाली असणाऱ्या मोजक्या देशांच्या (इंग्लंड, अमेरिका, रशिया व चीन) यादीत आता भारताचा समावेश झाला आहे.

५) २६ नोव्हेंबर रोजी आपल्या पंतप्रधानांनी हैद्राबाद येथील Safron Aircraft Engine Services India ( SAESI) फॅसिलिटी सेंटरचे उद्घाटन केले. GMR -erospace and Industrial Park, SEZ मध्ये ११ एकर जागेवर १,३०० कोटी रुपयांची गुंतवणूक करून ही सुविधा उपलब्ध केली जात आहे. टप्प्याटप्प्याने २०३५ पर्यंत हे केंद्र पूर्ण क्षमतेने चालू होईल. त्यावेळी वर्षाला ३०० विमानांच्या इंजिनांचे सर्व्हिसिंग येथे केले जाईल.

Safron कंपनीचे ग्लोबल मेंटेनन्स, रिपेअर आणि ओव्हरहॉलिंग चा हब तेथे असेल. आणि तेथे लीडिंग एज एव्हिएशन प्रॉपलेशन म्हणजे LEAP इंजिनचे, जी एअरबस, बोईंग आणि मिलिटरी च्या एम् ८८ विमानामध्ये वापरली जातात, सर्व्हिसिंग होईल.

Safron चे भारतातील हे पहिलेच केंद्र आहे. यामुळे विमानाच्या इंजिनचे सर्व्हिसिंग आता भारतातच सोयीस्कर, स्वस्त आणि सुरक्षित होईल.

६) २६ नोव्हेंबर रोजी केंद्रीय मंत्री परिषद गटाने ७,२८० कोटीची पीएलआय् योजना दुर्मिळ खनिज धातूसाठी जाहीर केली. यामध्ये उत्खनन व शुद्धीकरण आणि चुंबक उत्पादन या गोष्टी आहेत. येत्या तीन वर्षात १,२०० टन प्रति वर्ष चुंबक निर्मिती करणारे ५ कारखाने उभे केले जातील. आणि ७ वर्षात ६,००० टन चुंबकाची निर्मिती केली जाईल. हे चुंबक आणि दुर्मिळ धातू बहुतेक सर्व इलेक्ट्रॉनिक, ऑटोमोबाईल तसेच चीप बनवण्याच्या कारखान्यात लागतात. सध्या या गोष्टीसाठी चीनवर अवलंबून रहावे लागते.

७) इंद्रजाल ही भारतातील ग्रीन रोबोटिक्सने विकसित केलेली एआय-संचालित, स्वायत्त, ड्रोन-विरोधी प्रणाली आहे, जी रडार, कॅमेरे, आरएफ जॅमिंग आणि जीपीएस स्पूफिंग सारख्या तंत्रज्ञानाच्या जाळीचा वापर करून ड्रोन धोक्यांपासून व्यापक संरक्षण देते, त्याच्या नवीन इंद्रजाल रेंजर वाहनाद्वारे महत्वाच्या पायाभूत सुविधा संरक्षणासाठी एका ड्रोनपासून ते समन्वित ड्रोनच्या झुंडीपर्यंत सर्वकाही निष्क्रिय करण्यास सक्षम आहे. इंद्रजाल हे संवेदनशील ठिकाणांसाठी ३६०-अंश व सर्व-हवामानात संरक्षण ढाल प्रदान करते. ही यंत्रणा १० किमी अंतरावरील ड्रोन शोधते. व ४ किमीच्या लढाऊ आवरणात ड्रोन निष्क्रिय करण्यासाठी जॅमिंग, स्पूफिंग किंवा सायबर टेकओव्हरचा वापर करते.

८) जागतिक आव्हाने पार करून भारताने ऑक्टोबर २५ मध्ये, अमेरिकेत विक्रमी म्हणजे १.४७ अब्ज डॉलर (१२९ अब्ज रुपये) किंमतीच्या स्मार्टफोनची निर्यात केली. ऑक्टोबर २४ च्या तुलनेत ही उलाढाल तिपटीहून जास्त आहे. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोबर २५ या कालावधीत भारताने अमेरिकेत केलेली स्मार्टफोनची निर्यात १०.७७ अब्ज डॉलरवर (९४९ अब्ज रुपये) पोहोचली आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ही उलाढाल ३.६ अब्ज डॉलरची होती. भारताने जगभरात केलेली स्मार्टफोनची निर्यातही १५.९५ अब्ज डॉलर (१,४०४ अब्ज रुपये) वर पोहोचली आहे. भारतीय वस्तूवर अमेरिका आकारत असलेल्या वाढीव शुल्कानंतरही ही निर्यात वाढली आहे.

**कुमार आठवले**

# हिन्दू धर्म के सच्चे पथ-प्रदर्शक थे स्वामी श्रद्धानन्दजी

## - स्वामी श्रद्धानंद के बलिदान दिवस (२३ दिसंबर) पर प्रकाशनार्थ लेख

दिल्ली की जामा मस्जिद में खुली चर्चा हो रही थी। तब किसी ने सोचा भी नहीं होगा कि कोई हिन्दू विद्वान जामा मस्जिद में सनातन आर्य जीवन पद्धति अर्थात वैदिक धर्म की विशेषता समझा रहा होगा। ऐसे थे स्वामी श्रद्धानन्द।

दिल्ली की जामा मस्जिद में उन्होंने 'हम' का मतलब समझाया था– ह से हिन्दू और म से मुसलमान। यह संदर्भ देकर उन्होंने वहां मौजूद लोगों को अच्छी तरह समझा दिया था कि भारत के मुसलमान बाहर से नहीं आए हैं, बल्कि इस देश के ही हैं और यही कोई ५० से १०० साल पहले मुसलमान बनाए गए हैं। उन्होंने कहा कि हमें अपनी धरती पर विदेशी शासन मंजूर नहीं है।

'यतेमहि स्वराज्ये' – हम स्वराज्य के लिए प्रयत्न करते रहें। उन्होंने वेदों के आप्त वाक्यों के कई संदर्भ देते हुए कहा था कि हम सभी आर्यों की संतानें हैं और आर्य अर्थात श्रेष्ठ लोग कभी दासत्व को स्वीकार नहीं कर सकते। हम सभी अपनी मातृभूमि की सेवा करें और उसके लिए स्वयं का उत्सर्ग करें। ऐसे अनेक दृष्टांतों से उन्होंने लोगों पर अमिट छाप छोड़ी। उन्होंने ऊं शांति: शांति: शांति: से भाषण की समाप्ति की।

दूसरे दिन फतेहपुरी की जामा मस्जिद में भी उनका ऐसा ही भाषण हुआ था। यह घटना अप्रैल, १९१९ के पहले सप्ताह के जुम्मे के दिन की है। जब दिल्ली की जामा मस्जिद में खुदवा चल रहा था, तभी श्रोताओं ने कहा था कि श्रद्धानन्द को बुलाया जाय। मस्जिद के मिम्बर पर खड़े होकर स्वामी श्रद्धानन्द ने वैदिन मंत्रों का उच्चारण कर भाषण दिया था। भारत के इतिहास में यह पहला अवसर था और शायद अंतिम भी।

वस्तुत: १९१९ में अंग्रेजों ने रौलट एक्ट नाम का दमकारी कानून लागू कर दिया था। देश में हर जगह इस एक्ट का विरोध हो रहा था। अंग्रेजों ने गोलियां चलाई थीं। मारे गए लोगों में हिन्दू और मुसलमान दोनों थे। वर्ष १९१९ में ३० मार्च को दिल्ली के चांदनी चौक स्थित घंटाघर पर फिरंगियों के सामने छाती तानकर कहा था कि 'चलाओ गोली, भारत की जनता पर गोली चलाने के पूर्व तुम्हें इस संन्यासी की छाती को छलनी करना होगा। स्वामी को छाती खोल सामने खड़ा देख अंग्रेज सिपाही हड़बड़ा गए और पीछे हट गए। इस घटना का मुसलमानों पर गहरा प्रभाव पड़ा था। घटना के चार दिन बाद उन्हें जामा मस्जिद में तहरीर का निमंत्रण मिला था।

स्वामी श्रद्धानन्द अग्रिम पंक्ति के स्वतंत्रता सेनानी, सामाजिक चिन्तक, विद्वान, पत्रकार, लेखक, वक्ता और कुशल संगठनकर्ता थे। उनका नाम पहले वृहस्पति था, बाद में मुंशीराम हुआ। जिद्दी युवक जो कुसंगति और विसंगति के रास्ते चल पड़ा था। पिता उत्तर प्रदेश में पुलिस अधिकारी थे। एक दिन बरेली में महर्षि दयानन्द सरस्वती से उनकी भेंट हुई। उन्हें पहली बार पता चला था कि हिन्दू धर्म बहुत श्रेष्ठ है। शराब छुड़ाने में उनकी पत्नी शिवदेवी का भी बड़ा योगदान था। उनकी जीवन की दिशा बदल चुकी थी।

लाहौर में वकालत पढ़ने के क्रम में उनका संपर्क आर्य समाज से हुआ। समय मिलने पर या रविवार को गांवों में वेदों के प्रचार के लिए निकल जाते थे। धीरे–धीरे वे पूरी तरह से समाज सुधार के काम में लग गए। उन्होंने २४ मार्च, १९०२ को कांगड़ी में गुरुकुल की स्थापना की।

उन्होंने अपने दोनों पुत्रों का नामांकन भी वहीं कराया और स्वयं १५ वर्षों तक अवैतनिक आर्चाय रहे। गुरुकुल की प्रसिद्धि ईसाई मिशनरियों की आंख का कांटा बन रही थी। वैदिक पद्धति से चलने वाले गुरुकुल में घुड़सवारी और धनुर्वेद के प्रशिक्षण को आधार बनाकर कुछ पादरियों ने उत्तर प्रदेश के गवर्नर से शिकायत की। रेम्ज मेकडानल्ड की अध्यक्षता में जांच कमेटी हरिद्वार गई। मुंशीराम से मिलने के बाद रेम्ज मेकडॉनल्ड ने कहा था– 'एक महान, भव्य और शानदार मूर्ति, जिसे देखते ही आदर का भाव पैदा होता है। हमारे आगे हमसे मिलने के लिए आती है।'

वर्ष १९०६ में फिर जांच का नाटक चला और पटियाला रियासत में ८४ आर्यसमाजियों को गिरफ्तार कर लिया गया।

महात्मा मुंशीराम ने स्वयं केस लड़ा। अंग्रेज सरकार को मुकदमा वापस लेना पड़ गया। इससे पहले बालिकाओं के लिए उन्होंने जालन्धर में विद्यालय की स्थापना की थी। इन सबके बाद मुलतान, कुरुक्षेत्र, इन्द्रप्रस्थ, रोहतक के मटिंडू सूपा के साथ कई स्थानों में गुरुकुलों और दिल्ली में कन्या गुरुकुल की स्थापना की। इसके बाद मथुरा और गुजरात में भी इनकी प्रेरणा से गुरुकुल खुले।

जालंधर से उन्होंने उर्दू में सद्धर्म–प्रचारक नामक साप्ताहिक पत्र निकालना शुरू किया। संस्कृत के श्लोक भी ऊर्दू में ही लिखे जाते थे। बाद में जब यह कांगड़ी से निकलना शुरू हुआ, तो इसकी लिपि देवनागरी हो गई। उन्होंने मलिबरेडरफनाम का अंग्रेजी पत्र भी प्रकाशित किया। पुत्र इन्द्र विद्या वाचस्पति के संपादकत्व में अर्जुन नामक पत्र दिल्ली से निकालना शुरू हुआ। गुरुकुल से श्रद्धा का प्रकाशन भी शुरू हुआ। उन्होंने आर्य मुसाफिर नाम से उर्दू पत्र भी निकाला था।

वर्ष १९१७ में उन्होंने संन्यास ग्रहण कर लिया और अब उनका नाम स्वामी श्रद्धानन्द हो गया। वे गुरुकुल छोड़कर दिल्ली आए और स्वतंत्रता आन्दोलन से पूरी तरह से जुड़ गए। कई वर्षों तक वे कांग्रेस की केन्द्रीय कार्यकारिणी से सदस्य रहे। साल १९१९ में वे अमृतसर कांग्रेस के स्वागताध्यक्ष थे। वर्ष १९२० में नागपुर कांग्रेस में असहयोग आन्दोलन का उन्होंने समर्थन किया था। साथ ही सीडब्ल्यूसी के सदस्य होने के नाते उन्होंने खिलाफत आन्दोलन का समर्थन किया, लेकिन कुछ ही समय में उन्हें समझ में आ गया कि खिलाफत भारत के लिए खुली–आफत जैसा है, तो फिर उनका रास्ता अलग हो गया। उन दिनों लाला लाजपत राय और पंडित मदन मोहन मालवीय ने नेशनलिस्ट पार्ट बनाई। स्वामी श्रद्धानन्द उसके समर्थन में आए और राष्ट्रवादी विचारों के प्रसार पर काम शुरू किया।

स्वामी श्रद्धानन्द ने जातिवाद पर चोट की और अछूतोद्धार का काम अपने घर से ही शुरू किया। उन्होंने अपने दोनों बेटे हरिश्चन्द्र और इन्द्र वाचस्पति और वेद कुमारी का विवाह स्वजातियों में नहीं, बल्कि वैसी ही जातियों में किया था। उन्होंने गुरुकुल के माध्यम से भी अछूतोद्धार को आगे बढ़ाया।

भारत की एक बड़ी समस्या रही है धर्मान्तरण की। वर्ष १९१२ में कर्नल यू. मुखर्जी से भारत में जनसंख्या के अनुपात का हाल सुनने के बाद उन्होंने गहन चिन्तन शुरू कर दिया था। साल १९२२ में आगरा में उन्होंने भारतीय हिन्दू शुद्धि सभा की स्थापना की। आगरा के मलकाना राजपूत मुसलमान बन गए थे। वे वापस हिन्दू धर्म में आना चाहते थे। यहीं से शुद्धीकरण की यात्रा शुरू हो गई। स्वामी श्रद्धानन्द ने दिल्ली से बुलन्दशहर और मेरठ तक लाखों मेव मुसलमानों का शुद्धीकरण किया था। सैकड़ों ऐसे प्रचारकों को समाज में उतारा, जो अलग–अलग सम्प्रदायों के जानकारों के बातचीत या शास्त्रार्थ कर सकते थे। इसके लिए स्वामी श्रद्धानन्द ने बड़ी संख्या में युवकों को भारतीय संस्कृति और हिन्दू धर्मग्रंथों का प्रशिक्षण दिया। युवकों को कुरान के अध्ययन–अध्यापन कर चर्चा करने का प्रशिक्षण दिया। स्वामी जी ने साफ कहा था कि जिस धार्मिक अधिकार से मुसलमानों को तब्लीग और तन्जीम का हक है, उसी अधिकार से अपने बिछुड़े भाइयों को वापस अपने घरों में लौटाने का हक हैं। १९२० में देश में कई जगह दंगे हुए। उनके भयंकर परिणाम स्वामी जी के सामने थे। केरल के मोपला, पंजाब के मुल्तान, कोहाट, अमृतसर, सहारनपुर आदि में हुए दंगों को लेकर वे काफी गंभीर थे।

शुद्धि आन्दोलन को लेकर मुसलमानों में प्रचन्ड प्रतिकिया हुई। जमायत–उल–उलेमा ने मुंबई (तब बम्बई) में १८ मार्च, १९२३ को बैठक कर स्वामी श्रद्धानन्द एवं शुद्धि आन्दोलन पर निंदा प्रस्ताव पारित किया। कट्टरपंथियों ने षड्यंत्र रच दिया था। श्रद्धानन्द बाजार (तब नया बाजार) में उनके आवास पर २३ दिसम्बर को शाम लगभग चार बजे अब्दुल रशीद नाम का व्यक्ति धर्म पर जानकारी पाने का बहाना बना कर आया। उसने पानी मांगा। धर्म सिंह पानी लाने चला गया। इसी समय अब्दुल रशीद ने स्वामी जी पर तीन गोलियां दाग दीं। उनकी हत्या से देश हतप्रभ था।

स्वामी श्रद्धानन्द पर बड़ी संख्या में पुस्तकें लिखी गईं। उन्होंने ही सबसे पहले गांधी जी को महात्मा कहा था। राष्ट्रीय स्वयंसेवक संघ के संस्थापक डॉ. केशव बलिराम हेडगेवार के घर में कुछ महापुरुषों के चित्र लगे थे। उनमें स्वामी श्रद्धानन्द का भी चित्र था। दक्षिण अफ्रीका से भारत आने पर गांधी जी ने कहा था कि मुझे सी. एफ. एंड्यूज ने जिन तीन लोगों से मिलने को कहा था, उनमें से एक स्वामी श्रद्धानन्द जी हैं। स्वामी श्रद्धानन्द देश के लोगों के लिए प्रेरणा हैं। आज भी देश में समस्या और संकट के समय उनके कार्यों में समाधान खोजा जाता है।

**प्रसून कुमार मिश्र**

**(लोकसभा टेलीविजन में पत्रकार)**

# दासबोध जयंती - प्रसार आदर्श विचारांचा!

आपली सनातन संस्कृती आणि विचारधारा ही इतकी समृद्ध आहे की आपण विविध प्रकारे घेत असलेले ज्ञान हे सतत तोकडे वाटत राहते. सनातनियांना तसेच समाजात वावरताना सामान्यपणे अध्यात्म तसेच आदर्श विचार सहज सोप्या पद्धतीने समाजात रुजवण्याचे कार्य आपल्या संत महात्मे यांनी केले आहे. साधारण १७ व्या शतकात आपल्याला लाभलेले थोरसंत म्हणजे संत रामदास स्वामी... त्यांनी सोप्या शब्दात मनाचे श्लोक तसेच दासबोध अशा ग्रंथांमधून समाजाला रोजच्या जीवनातील विविध विषयांवर सोप्या शब्दात मार्गदर्शन केले आहे.

समर्थ संप्रदायाचे संस्थापक समर्थ रामदास स्वामी यांनी दासबोध ग्रंथाची निर्मिती केली. श्रीरामाची आणि हनुमंताची उपासना करणाऱ्या रामदास स्वामी यांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांची शिकवण दिली व ह्या विचारांचा प्रसार करत महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले. राजकारण आणि धर्मकारणावर प्रखर भाष्य करणारे समर्थ रामदास स्वामी हे एकमेव संत होते.

माघ महिन्यातील शुद्ध नवमी या दिवशी 'दासबोध' ग्रंथाची रचना रामदास स्वामींनी केली. त्यामुळे या दिवशी दोसबोध जयंती साजरी केली जाते. १७ व्या शतकात रचलेला दासबोध आजच्या काळातही तेवढाच परिपूर्ण वाटतो. दासबोधाच्या माध्यमातून रामदास स्वामींनी नेटकेपणाची जाण व उपदेश समाजाला केले आहे. स्वतःच्या लग्नाच्या बोहल्यावर सावधान झालेल्या रामदासांनी समाजाला संसार कसा करावा, संसार कसा असावा, याचे नेमके ज्ञान दिले. तसेच हनुमान भक्त असलेल्या समर्थांनी सूर्यनमस्काराचे महत्त्व सांगत आरोग्याचा गुरुमंत्र देत तरुणांना शरीर सौष्ठत्वाचे महत्त्व पटवून दिले.

१७ व्या शतकात माघ शुद्ध नवमीला रायगड जिल्ह्यातील तत्कालीन निबीड अरण्यात शिवथरघळ येथे दासबोध ग्रंथाची निर्मिती करण्यात आली. समर्थ रामदास स्वामी यांनी आपले पट्टशिष्य कल्याण स्वामी यांच्या करवी दासबोध ग्रंथाची निर्मिती केली. 'दासबोधाला ग्रंथराजाची उपमा दिली जाते.' दासबोधाची रचना अशी आहे की, हा ग्रंथ एकूण २० दशकांमध्ये विभागलेला आहे. प्रत्येक दशकात १० समास आहेत. यातून रामदास स्वामींनी संसारिकांना, साधकांना, निस्पृहांना, विरक्तांना, सर्वसामान्यांना बालकांना, प्रौढांना, सर्व जाती-पंथ धर्माच्या स्त्री-पुरुषांना आणि मानवी मनाला उपदेश केलेला आहे. दासबोध ग्रंथाची अनेक ठिकाणी आजही पारायणे केली जातात. समर्थांनी दोन वेळा दासबोधाची निर्मिती केली असे म्हटले जाते.

'दासबोध' ह्या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे... हा ग्रंथ एक प्रश्न उत्तरे ह्या स्वरुपात आहे. हा संत समर्थ रामदास स्वामींनी त्यांच्या शिष्याला म्हणजेच कल्याण स्वामी यांना उपदेश म्हणून तोंडी सांगितलेला आहे. करतो आणि भक्ती आणि ज्ञानाचा आध्यात्मिक ग्रंथ आहे. गुरु-शिष्य संवाद दासबोध ग्रंथाचे स्वरुप असणाऱ्या या ग्रंथात पारंपारिक पद्धतीने केले जाणारे गणेश वंदन, सरस्वती वंदन, गुरू वंदन दासबोधात आढळत नाही. हा ग्रंथ कोणता, त्याचे नाव काय, या ग्रंथात प्रामुख्याने काय सांगितलेले आहे. या ग्रंथामुळे काय मिळेल, अशी माहिती देणाऱ्या ओव्या दासबोध ग्रंथाच्या प्रारंभी येतात. त्यामुळे या ग्रंथाद्वारे विचार लोकांपर्यंत सहज पोहोचता येतात. एकूण २० दशकांमध्ये ७,७५१ ओव्या आहेत आणि हा ग्रंथ म्हणजे एक भक्ती, ज्ञान, आणि दैनंदिन जीवनातील समस्यांवर नेटके मार्गदर्शन स्वरुप आहे असे मानले जाते. हा ग्रंथ महाराष्ट्रभर समाज प्रबोधन आणि संघटन करण्यासाठी वापरला गेला आणि आजही तो अध्यात्मिक मार्गदर्शन, परमार्थ, आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश देतो. त्यामुळे 'दासबोद' ग्रंथाची जयंती साजरी करणे देखील महत्त्वाचे मानले जाते.

आता आपण थोडक्यात दासबोधातील प्रत्येक दशकात नेमके कशाबद्दल सांगितले आहे ते जाणून घेऊयात. ह्या ग्रंथात समर्थांनी सांसारिकांच्या, साधकांच्या, निस्पृहांच्या, विरक्तांच्या, सर्व सामान्यांच्या, बालकांच्या, प्रौढांच्या, जराजर्जरांच्या अशा सर्व जाती पंथ धर्माच्या स्त्री-पुरुषांच्या मानवी मनाला उपदेश केला आहे. या ग्रंथाचा पारायण देखील केले जाते. तसेच दासबोध या

ग्रंथावर आधारित परीक्षा घेण्यात येते. समर्थ रामदास स्वामींनी दासबोधाचे वर्णन खालीलप्रमाणे करून ठेवले आहे.

‘भक्तांचेनि साभिमाने।
कृपा केली दशरथीनें।
श्रवणद्वारें घेतां शोध।
मनकर्त्यास विशद।
परमार्थ होतो।।श्रीराम।।’
‘ग्रंथाचें करावें स्तवन।
स्तवानाचें काय प्रयोजन।
येथें प्रत्ययास कारण।
प्रत्ययो पाहावा।।श्रीराम।।’
जय जय रघुवीर समर्थ।।

समर्थ रामदासांनी प्रत्येक समासात जे उपदेशीले ते येणेप्रमाणेः

दासबोध/दशक पहिला – स्तवनांचा
दासबोध/दशक दुसरा – मूर्खलक्षणांचा



दासबोध/दशक तिसरा – सगुणपरीक्षा
दासबोध/चौथा दुसरा – नवविधाभक्तीचा
दासबोध/दशक पाचवा – मंत्रांचा
दासबोध/दशक सहावा – देवशोधनाचा
दासबोध/दशक सातवा – चौदा ब्रह्मांचा
दासबोध/दशक आठवा – मायोद्भवाचा
दासबोध/दशक नववा – गुणरुपाचा
दासबोध/दशक दहावा – जगज्योतीचा
दासबोध/दशक अकरावा – भीमदशक
दासबोध/दशक बारावा – विवेकवैराग्यनाम
दासबोध/दशक तेरावा – नामरुप
दासबोध/दशक चौदावा – अखंडध्याननाम
दासबोध/दशक पंधरावा – आत्मदशक
दासबोध/दशक सोळावा – सप्ततिन्वयाचा
दासबोध/दशक सतरावा – प्रकृतिपुरुषाचा
दासबोध/दशक अठरावा – बहुजिनसी
दासबोध/दशक एकोणिसावा – शिकवणनाम
दासबोध/दशक विसावा – पूर्णदशक

दासबोध हा केवळ एक धार्मिक ग्रंथ नसून, तो एक जीवन जगण्याचे सखोल तत्त्वज्ञान आणि व्यवस्थापनशास्त्राचा ग्रंथ मानला जातो. आजही अनेक लोक दासबोधाचे वाचन करून प्रेरणा घेतात आणि आपल्या जीवनात योग्य मार्गदर्शन मिळवतात. यामध्ये समर्थांनी प्रपंच, परमार्थ, भक्ती, ज्ञान, वैराग्य, राजकारण आणि समाजकारण अशा जीवनाच्या जवळजवळ सर्वच पैलूंचा सखोल विचार मांडला आहे. त्यामुळे लोकांना केवळ आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवणे हाच नव्हे, तर त्यांना कर्तव्यदक्ष, शहाणे आणि नीतिमान बनवणे हा देखील समर्थांचा उद्देश होता. त्यामुळे दासबोध जयंती साजरी करणे म्हणजेच समस्त समाजात नेटके आणि मार्गदर्शनपर सामाजिक आणि प्रापंचिक विचारांसा प्रचार व प्रसार करणे होय.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।

**ॲड. स्वाती जेरे**

# आधुनिक विज्ञान - नवनिर्माण की पुनर्शोध

## लेखांक - १

सध्या समाजात प्रत्येक क्षेत्रात ठळकपणे दोन परस्परविरोधी टोकाच्या विचारसरणी आढळून येतात. जसे की – एकीकडे धर्मनिष्ठा तर दुसरीकडे धर्म ही अफूची गोळी, एकीकडे 'जुने ते सारे सोने' तर दुसरीकडे 'जुने ते सारे टाकाऊ' आणि त्याच धर्तीवर पौराणिक विज्ञान म्हणजे कल्पनेची भरारी आणि गेल्या सहासात शतकात लागलेले शोध हाच विज्ञानाचा आरंभ! पूर्वीच्या काल्पनिक वैभवाच्या स्वप्नात आजही जगण्याची एक प्रथा आपल्या सुशिक्षित मध्यमवर्गातही पसरलीय असे कुत्सितपणे म्हणणारे आधुनिकतावादी आहेत.

भारताने विज्ञानाला काय योगदान दिले या प्रश्नावर 'काहीच नाही' व 'हे पूर्वी सर्वज्ञात होते' अशी दोनच उत्तरे मिळतील. यावर अनेक वैज्ञानिक, पौराणिक व आध्यात्मिक ग्रंथ वाचतांना जे मला प्रतीत झाले, उमगले ते मांडण्याचा एक प्रयत्न या लेखातून केला आहे. यापूर्वी मी ज्योतिष, पौराणिक, गूढ अशा विषयांवर दीर्घलेख लिहिले आहेत पण त्याचबरोबर हेही स्पष्ट करतो की मी मुळात विज्ञानातील (पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, गणित) पदवीधर आहे. त्यामुळे एकांगी नव्हे तर प्रामाणिकपणे सर्वांगीण विचारांच्या आधारे मुद्दे थोडक्यात मांडणार आहे.

अलीकडल्या सहा–सात शतकांत भारतात विज्ञान क्षेत्रात फारसे काही घडले नाही हे अगदी खरं पण प्राचीन काळापासून अकराव्या बाराव्या शतकापर्यंत भारताने जगातल्या विज्ञान–गणिताला मोठी देणगी दिली आहे हेही मान्य करण्यासाठी संदर्भ उपलब्ध आहेत.

पुराणे–रामायण–महाभारत ग्रंथातून वर्णिलेल्या गोष्टींवरून त्याकाळी आपल्याकडेही लेझरसारखे किरण, अतिसंहारक शस्त्रं, मिसाईल्स, चिरंजीव करणारी औषधं, विमानं आणि इतर बऱ्याच गोष्टी होत्या की त्या कल्पनाच होत्या? नारळीकरांसारखे वैज्ञानिक तर त्यास 'कल्पनाविलास (fiction)' ठरवून मोकळे झाले. खरंतर रंजक विज्ञान कथातून ज्या गोष्टी लेखकांनी रंगवल्या होत्या तशा गोष्टी काही काळानंतर सत्यात उतरल्या. दूरदर्शन, मोबाईल, ईमेल, टेलिफोन, क्षेपणास्त्रे, ड्रोन, अणुबॉम्ब, अंतराळयान, एक्स रे, यंत्रमानव ही काही उदाहरणे! मग हाच कल्पना सत्यात अवतरणे नियम पौराणिक–प्राचीन काळच्या वर्णनातील गोष्टींना लागू करायला नाकारणे ही पूर्वग्रहदूषित वृत्ती नव्हे काय?

विज्ञानाची आधुनिक व्याख्या म्हणजे सृष्टीतील घटक शोधणे, वस्तुस्थितीच्या घटकांचे वर्गीकरण, विश्लेषण करणे, सरासरी पद्धतीने निष्कर्ष काढून त्यांतील परस्परसंबंधांचे वैश्विक नियम शोधत राहणे असा आहे. याद्वारे सृष्टीचे रहस्य जाणणे हे विज्ञानाचे ध्येय असते. याचा अर्थ आधुनिक विज्ञान सार्वकालिक सत्य सांगू शकत नाही. त्याचे नियम सतत बदलत राहू शकतात.

याउलट प्राचीन विज्ञानप्रगती होती. आधुनिक विज्ञान फक्त जड सृष्टीशी मर्यादित आहे. पण न दिसणाऱ्या गोष्टींचा तपास ते करतच नाही. माणूस मरतो म्हणजे काय? आधुनिक विज्ञान म्हणेल की अवयवांचे कार्य थांबले म्हणजे मृत्यू! प्राचीन शास्त्र त्यापुढे जाऊन मेल्यावर घडते काय, हे सांगते. का घडते, कसे घडते ते सांगते. त्यातील प्रत्येक गोष्टीचा कार्यकारण भाव आपल्या तत्त्वज्ञानातून सांगितले आहे. विज्ञान फक्त असे होते एवढेच सांगते. प्राचीन शास्त्र मात्र 'असे होते, ते का? ते कसे होते? असेच का होते? अन्य काही का होत नाही' हेही पाहून मग निष्कर्ष काढते. कारण त्या प्राचीन ब्रह्मज्ञानींना सार्वकालिक त्रिकालाबाधित सत्य गवसले होते. आधुनिक विज्ञानाला अद्याप तीन मितींपलीकडे विशेष जाता आलेले नाही. चौथी मिती आता कुठे ते मान्य करू लागले आहेत. असो. तर आता काही रंजक तथ्ये पाहू.

(क्रमशः)

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈

## || श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ||

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

## मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : भाग १

# भारताची संस्कृती - जीवन पद्धती

या पृथ्वीतलावर मनुष्याचा जन्म झाल्यानंतर लगेचच मनुष्य सुसंस्कारित जीवन जगत नव्हता. भटकं जीवन, रानटी जीवन जगत असतानाच एकत्र राहण्यासाठी काही निती-नियम एकमेकांना त्याकाळी घालून दिले गेले असावेत. या निती-नियमांनाच धर्म असे संबोधले जाते, याचाच अर्थ धर्म म्हणजेच आचार - विचार - व्यवहारांची चाकोरी अथवा जीवन पद्धती होय.

अनादी कालापासून भारतामध्ये एका विशिष्ट पद्धतीने लोक आपला आचार - व्यवहार करत आहेत, त्या आचार - व्यवहारातूनच काही रुढी व परंपरा निर्माण झाल्या. या रुढी व परंपरा यांनीच पुढच्या काळामध्ये धर्माचे स्वरूप घेतले. आमच्या धर्मामध्ये असे चालते अथवा असे चालत नाही असे म्हणण्याचा प्रघात आला. भारत भूमीच्या या मातीमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाने ही जीवन पद्धती आचरली, सांभाळली व पुढच्या पिढीकडे सुपूर्द केली. त्यामुळेच या भूमीमध्ये आजपर्यंत ही आचरण पद्धती ज्यांनी-ज्यांनी स्वीकारली, त्या साऱ्यांनाच एका धर्मामध्ये गोवले गेले आहे. या भूमीला आपली मातृभूमी-पितृभूमी मानणाऱ्या, येथील महापुरुषांना आपले आदर्श मानणाऱ्या लोकांना हिंदू असे म्हटले जाते. सनातन काळापासून चालत आलेली जीवन पद्धती स्वीकारणारे सारेच हिंदू आहेत, ही भावना सर्वोच्च न्यायालयाने देखील एका प्रकरणांमध्ये सुचित केली आहे. या भूमीत राहणारा, या भूमीवर प्रेम करणारा प्रत्येक जण हिंदूच आहे. हीच आपली संस्कृती आहे व हाच आपला धर्म आहे.

- **आपण सारे हिंदू आहोत**

आपल्या देशातील रूढी-परंपरा जपणारा, संस्कृती पाळणारा प्रत्येक जण हिंदूच आहे, कारण या भूमीमधल्या सर्व प्रकारच्या जीवनपद्धतीचा अंगीकार करणारा व्यक्ती हिंदूच असू शकतो. त्यामुळेच आपण सारे खऱ्या अर्थाने हिंदूच आहोत.

भारतामध्ये मध्ययुगीन कालखंडामध्ये अनेक गोष्टी बदलत गेल्या. दुर्दैवाने वर्णपरंपरा दृढ झाली व यातूनच जाती - पोटजातींचा जन्म झाला. कदाचित काळाची गरज म्हणून - व्यवस्था म्हणून या गोष्टी आल्या असतील, परंतु आजच्या काळात मात्र जाती - पोटजातींमुळे धर्म विभागला गेला आहे. जाती - पोटजातींप्रमाणेच काही उपासना पद्धती व भक्तीचे वेगळे मार्ग चोखाळणारे संप्रदाय यांची देखील निर्मिती झाली. उपासना पद्धती, संप्रदाय हे हिंदू धर्माचे घटक आहेत, परंतु पुढे अभिमान जागृत होऊन यातील काही संप्रदाय व उपासना पद्धतीने स्वतंत्र धर्माचे स्वरूप घेतले. परकीय आक्रमणाच्या निमित्ताने येथे काही अहिंदू लोकही आले, येथेच राहिले, अनेक पिढ्या येथेच त्यांनी वास्तव्य केले. सहिष्णू असणाऱ्या हिंदू समाजाने या लोकांना स्वीकारले. या लोकांनी देखील येथील रुढी - परंपरा व संस्कृतींचा अंगीकार केला, त्यामुळे ते या भूमीचे घटक झाले म्हणूनच या भारत भूमीमध्ये असणाऱ्या प्रत्येकाने सनातन हिंदू धर्म जीवन पद्धतीचा अंगीकार केला आहे. अस्पृश्यता अथवा अन्य चुकीच्या गोष्टींमुळे धर्माबद्दल प्रेम अथवा श्रद्धा राहिली नाही, त्यामुळेच अलीकडच्या काळात जाती - पोटजाती, उपासना पद्धती, संप्रदाय, विदेशातून आलेल्या अहिंदू लोकांचे धर्म या साऱ्यांनीच आपण स्वतंत्र आहोत, आपण निराळे आहोत हा पवित्रा घेतला आहे. परंतु वास्तव जर विचारात घेतले तर आपण सारेच हिंदू आहोत.

**- डॉ. सचिन वसंतराव लादे, पंढरपूर**

**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख, रा.स्व.संघ**

◈ ◈ ◈



# माणूस एक विकाऊ वस्तू

- **'माणूस एक विकाऊ वस्तू' .. अर्थातच सर्व मनोविकारांचं मूळ**

५७९ पानांचं भलं मोठं जाड पुस्तक 'मनात' वाचत वाचत समारोपापर्यंत पोहोचलो. आतापर्यंत वाचलेल्या जवळजवळ सर्व माहितीचा सारांश (Gist) म्हणजे हे प्रकरण. जेवढं प्रभावी हे पुस्तक आहे, तेवढंच हे समारोपाचा भाग सुद्धा परिणामकारक आहे. यातला जेवढा भाग मला अत्यंत Appealing असा वाटला, तेवढाच आपल्यासमोर थोडक्यात मांडायचा प्रयत्न केला आहे.

एरिक फ्रॉम यांच्या विचारांचा संदर्भ घेऊन लेखक म्हणतात, कि, त्यांच्या मते माणसाच्या सुखाच्या कल्पना आजकाल बदलत चालल्या आहेत. त्याला परिपूर्ण माणूस बनण्याची इच्छा नाही, इतकंच काय, पण असं स्वप्नही तो पहात नाही. आता फक्त दूरदर्शन संच, मोटार– गाड्या, घरं आणि वेगवेगळ्या वस्तू (Commodities) यांचा जास्तीत जास्त साठा करणं, यातच तो सुख आणि आयुष्याची परिपूर्णता मानायला लागला आहे. त्यामुळे त्याला या वस्तू कितीही मिळाल्या तरी, त्याची हाव कमी होत नाही. त्याची सतत कोणाशी तरी स्पर्धा चालू असते.

आपलं आताचं सुख हे पूर्वीच्या अनुभवावर असतं. अमेरिकन मानसशास्त्रज्ञ 'हॅरी हेल्सन' याला Adaptation Level (बदलाशी जुळवून घेण्याची पातळी) असं म्हणतो. म्हणजे एखाद्या पातळीवरचं सुख आपल्याला मिळालं, कि, आपल्याला त्या पातळीची सवय होते. म्हणजे आपण त्या पातळीशी जुळवून घेतो, आणि त्याची आपल्याला सवय होते. मग, त्याच पातळीवर राहून आपलं समाधान होत नाही. म्हणून, मग, तो जास्त सुखाच्या मागे लागतो. म्हणूनच याला सुखाची Treadmill म्हणतात. Treadmill वर स्थिर होण्यासाठी सुद्धा धावावं लागतं.

एकदा एखादी गोष्ट मिळाली कि, माणसाचं समाधान वाढण्याऐवजी त्याच्या अपेक्षाच वाढत जातात. आणि मग, तो आणखी जास्त गोष्टी मिळवण्याच्या मागे लागतो. पण त्याच्याकडे सध्या त्या वस्तू नसल्यामुळे, तो पुन्हा असमाधानीच रहातो, आणि त्यांच्या मागे धावायला लागतो. अर्थात असं सगळ्यांनी असमाधानी रहाण्यातच कंपन्यांचा फायदा असतो. नाही तर लोक सतत नवनवीन वस्तू कशा विकत घेतील? म्हणून कंपन्या सतत जाहिरातबाजी करत रहातात, आणि सामान्य माणूस त्याला बळी पडतो.

पूर्वीइतकंच सुख किंवा समाधान मिळविण्यासाठी, त्याला सतत जास्तीत जास्त वस्तू, गोळा करत रहावं लागतं. पण, या सगळ्या प्रक्रियेत, त्याला सुख तर मिळत नाहीच, पण, प्रचंड मानसिक असुरक्षितता, एकाकीपणा आणि नैराश्य याला सामोरं जावं लागतं.

आपल्या अपेक्षा आणि, प्रत्यक्षातील वास्तव, यांच्यातील फरकावर आपलं सुखदुःख अवलंबून असतं. मग अशा परिस्थितीमध्ये सुखी कसं रहायचं? यासाठी मग अनेकजण अनेक मार्ग सांगतात. काहीजण आपापल्या धर्माचरणाप्रमाणे त्याग करायला सांगतात, अपेक्षा कमी करायला सांगतात. कर्म करत रहा,फळाची अपेक्षा करू नकोस, असं भगवद्गीता ही सांगते. अर्थातच, आजच्या चंगळवादी महत्वाकांक्षी जगात, यांचं पालन करणं जवळपास अशक्य असतं, हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

आजच्या स्वार्थी, स्पर्धात्मक, चंगळवादी शहरी पैशाच्या मागे लागणाऱ्या संस्कृतीत माणूस विभक्त कुटूंबात रहायला लागला. त्यामुळे त्याचं स्वातंत्र्य वाढलं, पण त्याची सुरक्षितता गेली आणि त्याला एकाकीपण आलं. एरिक फ्रॉम च्या म्हणण्यानुसार, हा एकाकीपणा दोन तऱ्हेने घालवता येतो. एक म्हणजे, हार मानणं, माघार घेणं आपल्याच कोषात गुरफटून घेणं. किंवा दुसरा पर्याय म्हणजे, प्रत्येक क्षण उत्कटतेने जगणं आणि स्वतःची आकलनक्षमता वाढवणं. दुसऱ्या शब्दांत सांगायचं तर, एक तर सतत बधिर अवस्थेत जगणं, किंवा, जीवनाचा सर्व अंगाने आनंद लुटणे. फ्रॉम च्या मते, बऱ्याच जणांना जाणवत नसलं तरी, ते बधिर होऊन जगणंच पसंत करतात. थोडक्यात, ते जन्माला येण्यापूर्वीच मेलेले असतात. ते फक्त शरीराने जगत असतात. गरज नसली तरी, नवनव्या चैनीच्या क्रयवस्तू जमवत रहातात. त्याचा आनंद घेण्यापेक्षा, फक्त त्या आपल्या मालकीच्या आहेत, यातच स्वतःला आनंदी असल्याचं पटवत रहातात. फ्रॉमच्या दृष्टीने जगतांना एक मोठा पर्याय आपल्यासमोर असतो. तो म्हणजे, To Have or To Be' . म्हणजे आपण कशावर तरी मालकी असल्याबद्दल आनंद मानत वस्तू जमवायच्या की, खऱ्या अर्थाने आयुष्यातला आनंद घेत जगायचं.

आपण वस्तू विकत घेतो तेव्हा, त्या आपल्या मालकीच्या आहेत, असं आपल्याला वाटतं, पण खरंतर त्या वस्तूच आपल्यावर मालकी हक्क गाजवायला लागतात. याचाच परिणाम म्हणजे, आपण स्वतःच एक क्रयवस्तू किंवा बाजारात विकली जाणारी Commodity होऊन जातो. आपण किती सुस्वभावी, सुसंस्कृत, मानवतावादी, विवेकवादी, विनम्र आणि सहिष्णू आहोत, म्हणजेच खऱ्या अर्थाने मानवतेला किती उपयोगी आहोत, (Use Value) यापेक्षा, आपला बाजारभाव काय आहे (Exchange Value) काय आहे, म्हणजेच आपण किती पैसे कमावतो, यावरून मग इतर लोक आपलीही किंमत करायला लागतात. आपलं स्वतःचं मूल्यमापन 'इतरांच्या' आपल्याविषयीच्या मतांमुळे करायला लागत असल्यामुळे, आपणही स्वतःची किंमत आपल्याला मिळणाऱ्या या पैशांवरून म्हणजेच Exchange Value वरून करायला लागतो. आपण स्वतःच एक Commodity क्रयवस्तू बनतो.

याच मनोवृत्तीतून स्वतःला विकणं सुरू होतं. एवढंच नव्हे, तर, असं विकलंच पाहिजे असं ही संस्कृती शिकवते. त्यामुळे, प्रत्यक्ष चांगलं, कुशल आणि ज्ञानी असण्यापेक्षा ज्ञानी असल्याची शोबाजी करण्याला या व्यवस्थेत प्रचंड महत्त्व असतं.

इथे या बाजारपेठेत प्रत्येकजण क्रयवस्तूच होतो असं नाही, तर स्वतःला जास्तीत जास्त विकायलाही बघतो. मग, फक्त ज्ञान आणि हुशारी, कामातील कसब, यांच्यापेक्षा आपण इतरांशी कसं गोड बोलून, त्यांना Manipulate करतो यालाच महत्त्व येतं. त्यामुळे समाजातील मूल्यंच बदलतात. साधेपणा, सच्चेपणा, ज्ञान, वाचन माणुसकी, वैगेरे पेक्षा माणूस कसा दिसतो, स्वतःला कसा सादर करतो, कसा व्यक्त होतो, त्याचा हुद्दा, त्याचे पैसे, हेच महत्त्वाचे ठरायला लागतात.

एखाद्या क्रयवस्तूची किंमत Exchange Value वाढविण्यासाठी, आपण जसा त्याचा रंग, आवरण Packings आणि इतर गोष्टी बदलतो किंवा त्या जास्त आकर्षक करतो, तसंच माणसं स्वतःचही करायला लागतात. प्रत्येकजण आपली मिळकत किंवा Exchange Value दारावर लिहू शकत नाही, किंवा पेपरमध्ये छापून शकत नाही. पण मग, आपण घालणारे बूट, गॉगल्स, वापरणारी गाडी, आपण रहातो ते घर, इतकंच काय, पण आपण वापरतो ते पेन, किंवा घड्याळ, अशा गोष्टी आपल्या मिळकतीच्या दर्शक ठरायला लागतात.

मग, या शर्यतीत सगळ्यांनाच यशस्वी होता येत नाही. मग, आपल्या महत्वाकांक्षा, अपेक्षा आणि इच्छा या गोष्टी आणि प्रत्यक्षातील वास्तव, यात दरी पडत जाते. यातून मग, नैराश्य, न्यूनगंड, आत्मविश्वास, आत्मसन्मान यांचा अभाव अशा अनेक गोष्टी सुरू होतात. इतर आपल्याला कमी लेखायला लागतात, किंवा आपल्याला कमी लेखतात अशी नुसती कल्पना करून, आपणही मग स्वतःला कमी लेखायला लागतो. मग, यातून हे दुष्टचक्र वाढत जाऊन मनोविकार वाढत जातात.

हे महत्वकांक्षी, चंगळवादी लोक, Manipulative सुद्धा असतात. आपल्या फायद्यासाठी ते इतरांचा शिडी सारखा वापर करतात. त्यांना वापरून झालं की, त्यांची बिल्कुल फिकीर करत नाहीत. अशा मंडळींना खूप कमी आत्मसन्मान असतो. ते अपयश पचवू शकत नाहीत. सतत यश, पैसा स्तुती, प्रसिद्धी यांचं Tonic त्यांना लागतं. ते थोडा काळही, आणि थोडंसं ही कमी झालं त्यांचा मानसिक समतोल आणि आत्मविश्वास ढळतो. पण, बाहेरून कितीही स्तुती ऐकली तरी अशा लोकांना मनोमन आपण कोण आहोत, आपल्या मर्यादा काय आहेत, यांची पुरेपूर जाणीव असते. त्यामुळे वास्तव आणि स्वतःची स्वतःविषयीची प्रतिमा यांच्यातील फरक एका मर्यादेच्या बाहेर गेला की, मानसिक ताण, नैराश्य जाणवायला लागतं. हे अंतर जास्त नसणं तर ते, मानसिक पातळीवर चांगलं आणि निरोगी व्यक्तिमत्वाचं लक्षण असतं.

फक्त स्वार्था भोवती स्वतःची कृत्यं आणि स्वतःचे विचार सतत घोळवत बसण्यापेक्षा इतरांचा, समाजाचा विचार केला, इतरांच्या सुखात आपण आपलं सुख मानलं तरच, तो माणूस मानसिकदृष्ट्या जास्त सक्षम, वरच्या पातळीवर जातो.

तर असं हे एक नितांत सुंदर पुस्तक आवडत्या पेयाचे सावकाश आणि तब्येतीत घुटके घेतल्याप्रमाणे वाचून संपवलं आहे. आपण अजूनही जर वाचलं नसेल तर, या विषयाची आवड असल्यास जरूर वाचा. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर आपण असाल तरी हरकत नाही. मदेरसे आये, दुरुस्त आये म या न्यायाने आपल्या विचारात थोडा जरी फरक करुन घेता आला तर हे पुस्तक वाचल्याचा फायदा नक्कीच होईल, यात शंका नाही.

**ब्रह्मानंद घुगरे**

**संदर्भ – पुस्तक 'मनात' –**

**लेखक श्री अच्युत गोडबोले**

◈ ◈ ◈

# एक वर्तुळ पूर्णत्वाकडे!

काल अंदमान, विजयापुरम (पोर्ट ब्लेअर) येथे दोन कार्यक्रम संपन्न झाले. एक होता सावरकर ह्यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरणाचा आणि दुसरा होता स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या सागरा प्राण तळमळला ह्या अप्रतिम, उत्कट काव्याच्या ११५ वर्षे पूर्ण झाल्याचा.

दोन्ही कार्यक्रमातील अतिथी गण, वक्ता गण हे ह्या कार्यक्रमाला, स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या विचाराला न्याय देणारे असे महानुभाव परम पूजनीय सरसंघचालक मोहनजी भागवत, देशाचे कणखर गृहमंत्री अमित भाई शहा आणि ह्या गाण्यांच्या मुळे काँग्रेसच्या मर्जीतून उतरलेले हृदयनाथ मंगेशकर असे होते त्यामुळे ह्या कार्यक्रमाची उंची अधिकच वाढली असे म्हणावे लागेल.

अखेर कधीतरी ह्या क्रांतीसुर्याला न्याय मिळाला हा भाव असंख्य सावरकर भक्तांच्या मनात आल्याशिवाय राहिला नसेल. इतिहासाचे वर्तुळ डाव्या आणि काँग्रेसी माणसांनी आपल्या स्वार्थी त्रिजेच्या आधारावर आखण्याचा जो प्रयत्न केला त्या वर्तुळाची त्रिज्या आता राष्ट्रभक्ती आणि हिंदुत्वाचा प्रखर विचाराने त्या वर्तुळाला पूर्णत्वाकडे नेण्यात यशस्वी होईल ह्याची जाणीव कालच्या कार्यक्रमाने सर्व भारताच्या मनात नक्की आली असणार.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतीची मशाल हातात धरण्यासाठी 'मारता मारता मरेतो झुंझेन' अशी घोर प्रतिज्ञा घेणारे सावरकर, ह्यांच्या घराला, परिवाराला इंग्रजांनी तर उध्वस्त केलेच पण स्वातंत्र्यानंतर 'बिना खड्ग बिना ढाल' वाल्यांनी सावरकरांच्या विचार आणि तत्वाला हर प्रकारे उध्वस्त करण्याचा प्रयत्न केला किंबहुना पारतंत्र्यात काळे पाणी भोगून सुद्धा न डगमगलेल्या ह्या क्रांतीसुर्याला स्वातंत्र्यानंतर खोट्या आरोपात जेल मध्ये पाठवण्याचे पाप समस्त नेहरू गँगने केले.

सावरकर ह्यांचे विचार पुसून टाकण्यासाठी त्यांच्या अनुयायांना वाळीत टाकून 'सावरकर' ही जणू काही शिवी आहे असा आभास दुर्दैवाने भारतीय म्हणवणाऱ्या सरकारने आणि त्या सरकारच्या शागीर्द मंडळींनी केले. देशासाठी सर्वस्वाचा होम करणाऱ्या सावरकर ह्यांना त्यांच्या उत्तर आयुष्यात जेंव्हा देश स्वतंत्र झाला होता तरीसुद्धा आपल्याच लोकांच्या कडून किती वेदना सहन कराव्या लागल्या असतील त्या वेदना त्यांनाच समजू शकतात ज्यांना हा महापुरुष समजला असेल.

काही परिवार, काही घराणी आणि काही ठराविक विचार ह्यांनी देशाच्या स्वातंत्र्याचा ठेका घेतला होता अशा आविर्भावात आणि अभिनेवेशात देशाच्या स्वातंत्र्याचा इतिहास लिहिणाऱ्या काँग्रेसी आणि डाव्यांनी स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी केलेल्या बलिदानाचे सुवर्णपान हे झाकून ठेवले. त्या प्रेरणादायी इतिहासातून नव्या पिढीला त्याग, समर्पण, देशभक्ती ह्याची प्रेरणा देण्याऐवजी लाभार्थी पिढी घडवण्याचे पाप ह्या मंडळींनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी केले.

पण कालचक्र फिरत असते. सत्य हे झाकून ठेवले तरी ते कधीतरी प्रकाशित होतेच. सूर्य झाकून ठेवण्याचे प्रयत्न जसे तात्कालिक ग्रहण काळात फक्त यशस्वी होतात तसेच सावरकर नावाच्या ह्या क्रांतीसुर्याचा ग्रहण काळ आता संपला असावा असे काहीसे कालच्या त्या कार्यक्रमातून जाणवल्याशिवाय राहवले नाही.

देश आणि आपला हिंदू समाज ह्यांचा शत्रू बोध खऱ्या अर्थाने ज्यांना समजला त्या मध्ये जसे छत्रपती शिवराय होते, राणा प्रताप होते, गुरु गोविंदसिंग होते त्यात आधुनिक काळात सावरकर आणि नेताजी सुभाष बाबू, डॉ. हेडगेवार हे होते. त्यातून आत्मबोध निर्माण व्हावा म्हणून हा महापुरुषांनी आपल्या आपल्या पद्धतीने प्रबोधन, संघटन, सशस्त्र क्रांती असे मार्ग स्वीकारले.

ह्या महापुरुषांचा विचार मागे पडला. शत्रूबोधाचा विसर पडला. आत्मबोधाची जाणीव हरवली. त्याचा परिणाम म्हणून देशात सामाजिक, प्रादेशिक प्रश्नाची मालिका तयार झाली. नुकसान ह्या महापुरुषाचे काही होणार नव्हते कारण स्वातंत्र्याच्या बालिवेदीवर सर्वस्व अर्पण केल्यावर सावरकरांना गमावण्यासारखे काहीच नव्हते.

नुकसान समाजाचे झाले. नुकसान देशाचे झाले. नुकसान नव्या पिढीचे झाले.


देशासाठी बलिदान करणाऱ्यांच्या कथा ऐकून आता देशासाठी जगायचे म्हणजे काय? कसे आणि का? हे स्वातंत्र्यानंतर नव्या पिढीला कळले नाही आणि परिणामी स्वार्थ केंद्रित, भ्रष्टाचार युक्त, व्यक्ती आधारित एक व्यवस्था येथे उत्पन्न झाली. ज्यांना हे सगळे घडवून आणायचे होते त्यांना सावरकर विचार हे कधीच पचणारे नव्हते, समजणारे नव्हते आणि आचरणात आणण्याचा तर प्रश्नच नव्हता.

पण काळ कधीतरी सूड उगवतो. वर्तुळ कधीतरी पूर्ण होते. जीवनाचे चक्र पुन्हा सत्याकडे झुकते. सगळीकडे असणाऱ्या अंधारातून दिप प्रज्वलित होतो आणि अशा असंख्य प्रज्वलित दीपामधून सत्याचा प्रकाश असत्याचा अंधार दूर करण्यात यशस्वी होतो.

तेच अंदमानात घडले आहे. सावरकर ह्यांचा पुतळा तेथे उभा राहिला आहे. अपेक्षा अशी आहे की हा पुतळा असंख्य देशभरातील पुतळ्यांच्या पैकी एक असा न राहता अखंड देशाच्या क्रांतीचा इतिहास आणि बलिदान ह्याची आठवण करून देत जिवंत प्रेरणा बनेल. तो पुतळा शब्दातून कदाचित बोलणार नाही पण त्या पुतळ्याकडे काही क्षण बघितल्यावर बाबाराव आठवतील. अनंत कान्हेरे आठवतील. चाफेकर बंधू आणि वासुदेव बळवंत आठवतील. भगतसिंग, राजगुरु, सुखदेव ह्यांचे बलिदान आठवेल. छोट्या वयात फाशी गेलेला खुदीराम आठवेल. मदनाला धिंग्रा आणि उधमसिंग आठवतील. आठवतील चंद्रशेखर आझाद आणि विष्णू गणेश पिंगळे. आणि नकळत स्पंदन पावलेली मने गाऊ लागतील 'गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार'!

सावरकर ह्यांची वचने पुसून टाकणाऱ्या नीच वृत्तीच्या देशद्रोही माणसांना सांगावे लागेल, देशाच्या इतिहासाचे वर्तुळ पूर्णत्वाकडे जात असताना नवी पिढी कितीही प्रयत्न केला तरी सावरकर विचारापासून लांब जाऊ शकणार नाही कारण तो विचार कालातीत आहे आणि तेव्हढाच प्रखर सत्याचा आविष्कार!

**रवींद्र मुळे**



# स्वदेशी विमानवाहू युद्धनौका : आय एन एस विक्रांत

या वर्षीच्या दिवाळीतील सोमवार दिनांक २० ऑक्टोबर २०२५ हा दिवस भारतीय इतिहासामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. कारण भारताचे लोकप्रिय व यशस्वी पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी जी यांनी त्यांच्या प्रथेप्रमाणे दिवाळी गोवा येथे स्वदेशी विमानवाहू युद्धनौका आय. एन. एस. विक्रांत च्या नौसैनिकां समावेत साजरी केली.

आय. एन. एस. विक्रांत युध्दनौकेवरून देशाला संबोधित करताना ऑपरेशन सिंदूर मधील शौर्याबद्दल तीन्ही सेनांच्या बहादूर जवानांना वंदन करून स्वदेशी शस्त्रास्त्रां मुळे भारताच्या वाढलेल्या ताकदीचा उल्लेख केला व जगात भारताचा जागतिक दबदबा निर्माण झाल्याचे व आत्मनिर्भरतेमुळे झालेल्या महाशक्ति मुळे पाकिस्तान ची झोप उडाली असून ते चिंताग्रस्त आहेत. त्याच बरोबर भारतीय नौसेनेचा पराक्रम आणि हिंदी महासागरातील शक्ती संतुलन राखण्यात नौसेनेचे योगदान व महत्व अधोरेखित करताना सुरळीत समुद्री व्यापार व सुरक्षित समुद्री वाहतूक याचबरोबर संकटकाळी नागरीकांना सुरक्षित बचाव करून सोडविणे नौसेना करत आहे, ही देशासाठी अभिमानाची बाब आहे. गेल्या दहा वर्षात भारतात मोठ्या प्रमाणात स्वदेशी युद्धनौका व पाणबुड्या बनवत असून सध्या चाळीस दिवसात एक याप्रमाणे स्वदेशी युद्धनौका अथवा पाणबुडी, भारतीय नौसेनेत दाखल होत असून नौसेनेची ताकद दिवसेंदिवस वाढतच आहे. INS विक्रांत बस नाम ही काफी है।, भारतीय नौसेने ची शक्ती वाढवणाऱ्या INS विक्रांत ची माहिती आपण माझ्या या लेखात घेणार आहोत

भारतीय नौसेना युद्धनौका विक्रांत या भारतीय बनावटीच्या पहिल्या विमानवाहू युद्धनौकेचे राष्ट्रार्पण सोहळा कोचीन येथे दिनांक ०२ सप्टेंबर २०२२ यादिवशी पार पडला. भारताचे यशस्वी व लोकप्रिय पंतप्रधान माननीय नरेंद्रभाई मोदीजींच्या हस्ते ही महाकाय विमानवाहू युद्धनौका IAC-I (Indian Aircraft Carrier) नौसेनेमध्ये दाखल झाली. सर्व प्रकारच्या हवाई उड्डाण चाचण्या २०२३ मध्ये पूर्ण करून आपली ही युद्ध नौसेना का भारतीय किनारपट्टी व सुदूर समुद्र याचे रक्षण करण्यासाठी नौसेनेच्या सेवेत दाखल झाली.

महाकाय भव्य दिव्य अशी विक्रांत युद्ध नौका कोचीन शिपयार्ड लिमिटेड या कोचीन केरळ येथील जहाज बांधणी कारखान्यात प्रथमच बनवली असून अशी क्षमता असणाऱ्या मोजक्या प्रगत देशांच्या पंक्तीत भारत समाविष्ट झाला आहे. स्वातंत्र्याच्या अमृत काळामध्ये सुरुवातीसच हा मोठा प्रकल्प पूर्ण करून एक आत्मनिर्भर भारत अभियानाद्वारे स्वयंपूर्णतेकडे टाकलेले भक्कम पाऊल होय. यामुळे भारताच्या प्रबळ क्षमतांचे दर्शन, भारतीयांची कार्यनिष्ठ बौद्धिक संपदा तथा हुशारी, कार्य प्रेरणा व कार्यक्षमता दिसून येते. विक्रांत हे भारतीयांच्या कौशल्य, भारतीय सामग्री संसाधने आणि दृढनिश्चयाचेच द्योतक आहे.

संरक्षण सामग्री, साधने व संसाधनासाठी तसेच शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे या क्षेत्रातही भारताने स्वयंपूर्णच असले पाहिजे असा आग्रह १९९८ मध्ये भारताच्या अणुचाचण्यानंतर जेंव्हा सर्व जगाने भारताला वाळीत टाकले होते, sanctions लावले होते, त्याचवेळी तत्कालीन पंतप्रधान माननीय अटल बिहारी बाजपेयी जी यांनी धरला होता. पंतप्रधान माननीय अटल बिहारी बाजपेयी जी यांच्या सशक्त भारत समर्थ भारत घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी स्वावलंबी भारत संरक्षण क्षेत्रात या भूमिकेची घोषणा तत्कालीन डीआरडीओ प्रमुख डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांनी केली. बऱ्याच अंशी संरक्षण तंत्रज्ञान आपल्याला नाकारले जायचे त्यावर उपाय म्हणून स्वतःचे तंत्रज्ञान विकसित करायचे धोरण डीआरडीओ मध्ये सुरू केले आणि अण्वस्त्रे, क्षेपणास्त्रे, रणगाडे, अणुबॉम्ब, रॉकेट लॉन्चर, रडार, नौदलीय व वायुदलीय शस्त्रास्त्रे अशा सर्व संरक्षण क्षेत्रातील तंत्रज्ञान विकसित करून स्वावलंबी बनवण्याचे सूत्र घेऊन DRDO चे कार्य चालू आहे.

आयएनएस विक्रांत या १९६१ मध्ये सेवेत दाखल झालेल्या जुन्या भारताच्या ब्रिटिश बनावटीच्या विमानवाहू युद्धनौकेने १९७१ च्या पाकिस्तान युद्धात भारताच्या विजयामध्ये प्रचंड योगदान दिले. ती एकमेव युद्धनौका १९९७ मध्ये सेवानिवृत्त झाली. १९९९ मध्ये आपली स्वतःची भारतातच तयार केलेली अशी

युद्धनौका बनवण्याची इच्छा तत्कालीन प्रधानमंत्री माननीय अटलजी यांनी व्यक्त केली. त्यानुसार प्रकल्प ७१ एअर डिफेन्स शिप अर्थात एडीएस अंतर्गत याचे आरेखन व अभिकल्पन सुरू झाले. वॉरशिप डिझाईन ब्युरो अर्थात पूर्वीचे इंडियन नेव्ही चे डायरेक्टरेट ऑफ नेवल डिझाईन या नौसेनेच्या अनुसंधान व विकास विभागाने याचे अभिकल्पन केले. पहिल्यांदा कोचीन शिपयार्ड लिमिटेड (सीएसएल) ने २००१ मध्ये त्याचे प्रारूप ग्राफिक इंलस्ट्रेशनच्या माध्यमातून दाखविले त्यावेळी बत्तीस हजार टन वजन अपेक्षित होते, परंतु वेळोवेळी त्याच्या क्षमता वाढवत नेऊन ते ४५००० टन इतके झाले आहे.

या आयएनएस विक्रांत ची क्षमता व भव्यता त्याच्या रचनेवरून आपणास कळून येते. ही युद्धनौका २६२.५ मीटर लांब, ६२ मीटर रुंद व ५९ मीटर उंच अशा भव्य स्वरूपात तयार झाली. तरंगते विमानतळ यावर दोन धावपट्ट्या, एक १४४ मीटरची आखूड व दुसरी मोठी २०० मीटर लांबीची ज्यामुळे पाठोपाठ विमाने उड्डाण करू शकतात अशी रचना याच्या वरती केली आहे. एका अर्थाने विक्रांत जहाज हे तरंगते शहर ज्यामध्ये धावपट्या सुद्धा आहेत असे होय. उड्डाण क्षमता वाढावी म्हणून शॉर्ट टेक ऑफ बट अरेस्टेड रिकवरी (STOBAR) ही सुविधा ज्याच्यामध्ये हुक आणि वायर्स याची रचना केलेली आहे. म्हणजे विमान उतरताना ते हूक वायर मध्ये अडकणे आणि कमी अंतरावरती विमान थांबवण्याची प्रक्रिया शक्य असते. दुसरे म्हणजे धावपट्टीच्या शेवटी स्कायजंप साठी आठ डिग्रीज चा चढाव असणारा रॅम्प, ज्यामुळे संपूर्ण शस्त्रासह लढाऊ विमान सहजतेने जहाजावरून उड्डाण करण्यासाठी धावपट्टीच्या टोकाला ही सुविधा उपलब्ध केलेली आहे. जहाजावरच्या सर्व यंत्रणा, मशीनरी स्वयंचलित पद्धतीच्या अद्ययावत व अत्याधुनिक आहेत. या जहाजावरती एकूण १८ मजले असून हा एक भव्य महाकाय शहर किंवा तरंगता किल्लाच आहे.

विमानवाहू युद्धनौका म्हणजे नीलजल शक्ती म्हणजे ब्ल्यू वॉटर पावर मानली जाते. भारत हा स्वदेशी युद्धनौका बनवणाऱ्या देशांच्या गटात सहावा देश झाला आहे. आयएनएस विक्रांतच्या उभारणीत ७६% स्वदेशी योगदान असणारी साधने, मशिनरी, लोखंड, पोलाद व बऱ्याचशा उपप्रणाली, प्रणाली व भाग भारतातच बनवलेले आहेत. प्रत्यक्ष जहाज बांधणीचे काम तेरा वर्षे चालू होते कोचीन शिपयार्ड लिमिटेड येथे मोठे जहाज बांधणी केंद्र असून आवश्यक त्या सर्व सुविधा उदाहरणार्थ ड्राय डॉक यार्ड वगैरे आहेत. रशियाने जहाजासाठी लागणारे विशिष्ट पोलाद देण्याचे नाकारल्यामुळे बराच विलंब झाला, परंतु डीआरडीओ ने तीन प्रकारचे विशिष्ट पोलाद मिश्र धातू विकसित केले. डीएमआर २४९ए, डीएमआर २४९बी आणि डीएमआर २४९सी असे स्टील ज्याच्यापासून हल, डेक आणि एअर स्ट्रीप फ्लोअर यासाठी लागणारे योग्य पोलाद शोधून काढले, तयार केले व स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड अर्थात सेल या अंतर्गत बोकारो, भिलई व राऊलकेला पोलाद कारखान्यांनी पुरेशा प्रमाणात उत्पादन करून पोलादाचा पुरवठा केला. २६००० टन स्वदेशी पोलाद वापरून हल, डेक आणि धावपट्टी (एअर स्ट्रीप) तसेच सुपर स्ट्रक्चर तथा एव्हिएशन कॉम्प्लेक्स बनवण्यात आले. मेन स्विच बोर्ड, स्टिअरिंग गिअर, वॉटर टाईट हॅचेस या L&T मुंबई व तळेगाव या कारखान्याने बनवून दिल्या. एअर कंडिशन व रेफ्रिजरेशन प्रणाली किर्लोस्कर उद्योग समूहाने तर विविध पंप हे बेस्ट (बीईएसटी) व क्रॉम्प्टन कंपनीने बनवले. इंटिग्रेटेड प्लॅटफॉर्म मॅनेजमेंट सिस्टीम (आयपीएमएस) ही भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड BHEL कंपनीने बनवून दिले. इलेक्ट्रिक केबल्स या निको इंडस्ट्रीज ने व बरेच अन्य इलेक्ट्रॉनिक प्रणाली एम एस एम इ कारखान्यांनी बनवून दिल्या. या सर्वांची जोडणीचे काम सी एस एल ने पूर्ण केले.

विमानवाहू युद्धनौकेचे हल हे ८७४ मॉड्युल मध्ये बनवले व ते जोडून हल तयार केले यावर एकूण १४ डेक व १८ मजले आहेत एकूण २३०० खोल्या (कंपार्टमेंट्स) आहेत. जहाजावर सर्व मिळून १९६ अधिकारी, चौदाशे एकोणपन्नास वायूसैनिक महिलां वायूसैनिकांसह राहण्याची व्यवस्था आहे. सर्वांची भोजनादी व्यवस्थेसाठी चार मोठे सुसज्ज भोजन मंडप असून मोठ्या प्रमाणावर अन्न बनविण्याच्या सुविधा केल्या आहेत. सहा महिने पुरेल एवढा अन्नसाठा त्याच्यावरती केला जाण्याची क्षमता आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या नौदल अधिकारी सैनिक व कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सुसज्ज असे मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व सर्व औषधोपचारासह वैद्यकीय सुविधांची सोय केली आहे. रोज समुद्राच्या पाण्यापासून पिण्याचे पाणी रो थरींशी बनविण्याची ८०० टन क्षमतेची यंत्रणा असणारा प्रकल्प तसेच कपडे धुण्यासाठी लॉन्ड्री असणार आहे. या विमानवाहू युद्धनौकेची क्षमता ३० लढाऊ विमाने, १० हेलिकॉप्टर यासाठी धावपट्टी खालील मोठ्या हॅंगर ची व्यवस्था केली आहे. तिथेच पार्किंग, सर्विसिंग, तेल

पाणी, दुरुस्ती, इंधन भरणे आधी सुविधा असून आवश्यकतेनुसार विमानावर शस्त्रे, अस्त्रे बसवणे या हँगर मध्येच करतात.

विमानांवर बॉम्ब, शस्त्रे, अस्त्रे, दारुगोळा, क्षेपणास्त्रे ही बसवली जातात, भरली जातात. अशी युद्धसिद्ध लढाऊ विमाने सध्याच्या रचनेनुसार मिग २९ के ही ३६ विमाने साठवण्याची व्यवस्था आहे. तसेच के Ka-31, MH - 60 ही हेलिकॉप्टर च्या आवश्यकतेनुसार व्यवस्था करतात. अशी युद्धसज्ज विमाने व हेलिकॉप्टरची धावपट्टीवर ने आण करण्यासाठी सुपर स्ट्रक्चरच्या दोन्ही बाजूस समुद्रदर्शी उद्–वाहक म्हणजे लिफ्ट ची व्यवस्था केली आहे. कालांतराने भारतीय बनावटीचे लढाऊ विमान एलसीए नेव्ही व ड्व्हान्स लाईट वेट हेलिकॉप्टर (एएलएच) याचाही समावेश केला जाईल. त्याच्याही चाचण्या चालू आहेत. त्याचबरोबर राफेल–एम याचाही विचार चालू आहे. कमाव थर्टी वन Ka31 हेलिकॉप्टर एअर बोर्न अर्ली वार्निंग सिस्टीम रोल यासाठी दहा हेलिकॉप्टर तर सहा वेस्टलँड सी–किंग किंवा मल्टी रोल MH - 60 हेलिकॉप्टर पाणबुडी विरोधी लढाईमध्ये सक्षम व तरबेज आहेत. ही हेलिकॉप्टर पाणबुडी विरोधी लढाई (अँटी सबमरीन वॉरफेअर–एएसडब्ल्यू) क्षमता असणारी असतील.

४५ हजार टन इतक्या पाण्याचे विस्सरण करणाऱ्या या महाकाय व भव्य युद्धनौकेला गतिमान करण्यासाठी खूप शक्तिशाली इंजिनाची आवश्यकता असते ती जनरल इलेक्ट्रिक कंपनीचे एल एम ड्च् – २०० प्लस क्षमतेचे चार गॅस टर्बाईन संच, दोन प्रोपेलर शाफ्ट च्या साह्याने कमाल ३० नॉट्स वेगाने म्हणजेच ५६ किलोमीटर प्रति तास गतीने ८००० नॉटिकल माइल्स किंवा पंधरा हजार किलोमीटर पर्यंत एकूण जाता येते म्हणजेच एकदा भारताचा किनारा सोडला तर ब्राझील पर्यंत जाऊ शकते. या गॅस टरबाईन ची एकाची शक्ती २२ मेगावॉट इतकी प्रचंड आहे. यासाठी Elecon या भारतीय कंपनीने उत्पादन केलेल्या सीओजीएजी प्रकारच्या गिअरबॉक्स ची जोडणी, गॅस टर्बाईन शाफ्ट व प्रोफेलर शाफ्ट या दोघांचा दुवा बनते असे दोन शाफ्ट आहेत. युद्धनौका विक्रांत वरील सर्व कार्ये सुचारू होण्यासाठी जी विद्युत पुरवठा यंत्रणा आहे व विद्युत उत्पादन यंत्रणा आहे त्यासाठी १४ जनरेटर द्वारा २४ मेगावॉट प्रति दिन निर्माण करण्याची व्यवस्था आहे. ६००० टन डिझेल साठवण्याची क्षमता, १८ दिवस पुरेल अशी आहे. विक्रांत वर एलईडी दिवे बसवले आहेत त्यामुळे कमी देखभाल व कमीत कमी वीज खर्च आणि जास्तीत जास्त काम अपेक्षित आहे.

आयएनएस विक्रांत हे २ सप्टेंबर २०२२ रोजी इंडियन नेव्हीमध्ये सुरू झालेल्या भारतातील प्रथम स्वदेशी डिझाइन केलेले आणि बांधले गेले आहेत. हे युद्धनौका भारतातील सागरी क्षमता आणि संरक्षण तंत्रज्ञानामध्ये स्वावलंबनातील महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

- **इतिहास आणि विकास:**

१. डिझाइन आणि बांधकाम: भारतीय नौदलाच्या युद्धनौका डिझाइन ब्युरोने डिझाइन केलेले आणि कोचीमध्ये कोचीन शिपयार्ड लिमिटेड (सीएसएल) यांनी बांधले

२. किंमत: अंदाजे २३,००० कोटी (अंदाजे १ ३.१ अब्ज))

३. देशी सामग्री: एकूण ७६%, ९०% हल आणि ५०% प्रोपल्शन स्वदेशी आहे.

आयएनएस विक्रांत ने अरबी समुद्रातील मिलान २०२४ बहुराष्ट्रीय नौदल व्यायाम आणि ऑपरेशन सिंदूर यासह विविध व्यायाम आणि ऑपरेशन्समध्ये भाग घेतला आहे. सर्व चाचण्या पूर्ण केल्यानंतर त्याने संपूर्ण ऑपरेशनल क्षमता देखील साध्य केली आहे आणि ऑगस्ट २०२४ मध्ये वेस्टर्न फ्लीटमध्ये प्रवेश केला गेला. (क्रमशः)

**काशिनाथ देवधर**

◈ ◈ ◈


संवाद

# संवाद ट्रेडप्रिंट्स

**छपाई क्षेत्रातील एक दर्जेदार सचोटीपूर्ण व्यवहार**

**बी–७, गोवईकर इमारत, शनिवार पेठ, पुणे – ३० दूरध्वनी : (०२०) २४४८५६३२**

**Email : sanwadpvt@gmail.com**


आपल्या स्वप्नांना द्या जनसेवेचे पंख...
चारचाकी...
स्वत:साठी असो अथवा व्यवसायासाठी,
खरेदीसाठी एकाच पर्याय ....
जनसेवा कर्ज !
TUCSON
आपल्या आवडत्या
टू व्हिलरसाठी
किफायती
कर्ज फक्त जनसेवेचे !
स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास
जनसेवेच्या 'घरकुल' कर्जावर !
करा जगाची सफर !
जनसेवा आहे हमसफर !
जनसेवा पर्यटन कर्ज
• आकर्षक व्याजदर • तत्पर सेवा • अल्प प्रोसेसिंग फी
संपर्क : 8485871252
www.janasevabankpune.net
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय :
प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.

वार्षिक वर्गणी रू. २००/- फक्त

Date of Publication : 26/12/2025 and
Date of Posting : 28/12/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

- मासिक मुल्य रू. २०/- ● वार्षिक वर्गणी रू. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रू. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

oooo

## * हिंदुबोध जाहिरात दरपत्रक *

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | |
|---|---|
| रंगीत पूर्ण पान | रू. १.५ लाख |
| साधे पान | रू. १ लाख |
| साधे अर्धे पान | रू. ५०,०००/- |
| साधे १/४ पान | रू. २५,०००/- |
| साधे १/८ पान | रू. १२,०००/- |
| साधे १/१६ पान | रू. ६,०००/- |
| सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) | रू. २,१००/- |
| हिंदुबोध अंक मुल्य | रू. २०/- |
| वार्षिक वर्गणी | रू. २००/- |
| त्रैवार्षिक वर्गणी | रू. ५००/- |

## * हिंदुबोधची वर्गणी *

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१